# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००७ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | १० |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १२२**

MAHMARI 19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ
व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष आठवे / अंक १० / ऑक्टोबर २००७

## संपादकीय

## प्रदूषित वाहतूक व्यवस्था

महाराष्ट्रासह देशभरातील सर्वच जिल्ह्यांच्या ठिकाणांचे स्वरूप 'ग्रामीण' या वर्णनास सार्थ होते, तिथवर या सर्व ठिकाणची वाहतूक ही सायकलप्रधान होती. पण गेल्या पंचवीस तीस वर्षांत ही सर्व 'गावे' विकासाच्या रेट्यात अतिशय वेगाने पालटली. आर्थिक धोरणातील बदल, जीवनशैलीत झालेले बदल यांचा परिणाम होऊन नागरीकरण वाढत गेले व बदला आम्ही विकासाचे गोंडस नाव दिले! या सर्व भागांत नागरी प्रश्नांबरोबर वाहतूक विषयक समस्याही वाढत गेल्या.

उपलब्ध असणारी शेतजमीन व खाणारी तोंडे यांचे प्रमाण जसे विसंगत आहे तसाच वाहन संस्कृतीचा प्रकार आहे. स्वयंचलित वाहनसंख्या आणि ती चालवता येतील अशा सुस्थित, सक्षम रस्त्यांची संख्या यातही मोठी विसंगती आहे. स्वाभाविकच सर्व देशभरातील नवोदित शहरे अनेक नागरी समस्यांबरोबर वाहतूक खोळंब्यांच्या चक्रव्यूहात अडकली आहेत. अनेक शहरांत प्रदूषणाची पातळी धोकादायक पातळीच्या कितीतरी वर असते.

या प्रदूषणावर, प्रदूषित हवेवर व तिच्या मानवी आरोग्यावरील परिणामांवर अगणित संशोधने झाली. विद्यापीठांनी पदव्या वाटल्या. परिषदा भरवल्या गेल्या; पण हे प्रदूषण 'वाढता वाढता वाढे' असा विषय आहे. इंधनासाठी नैसर्गिक वायू वापरून या समस्येवर तोडगा काढण्याचा प्रयत्न आहे. पण या इंधनावरील वाहनांच्या गराड्यात सापडणारे नागरिक गुदमरतानाचा अनुभव घेतात. ६० एकक ही धोक्याची पातळी १२० एककाच्याही कितीतरी वर गेली अशी पुण्यातील अनेक शहरे देशात आहेत. लोकसंख्या चार पटीने वाढली तर वाहन संख्या ८७ पटींनी वाढली आहे असे पुण्यातील एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. रस्तारुंदीकरण, क्रॉंक्रीटीकरण, उड्डाणपूल या सर्व अल्पकालीन मलमपट्ट्या आहेत हे उघड सत्य आहे. सर्वांना याबद्दल सर्व कळते. मग या समस्येवर प्रभावी इलाज काय?

इतर देशांतील अनेक शहरांत स्वयंचलित वाहन संख्येवर नियंत्रण हाच एक इलाज मान्य केला गेला आहे. सामाजिक प्रतिष्ठेचे लक्षण म्हणून घरटी चार दोन स्वयंचलित वाहने वापरणारांनी हे पर्याय मान्य करणे हाच प्रभावी इलाज ठरेल. वाहनक्षय योजना राबवणारी अनेक शहरे अनेक देशांत आहेत. त्या सर्वांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा स्वीकार केला

(मुलपृष्ठ ३ वर)




वर्ष आठवे / अंक १० / ऑक्टोबर २००७

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाटक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १२ वे / अंक ४था)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com


## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. विजय बेडेकर, कार्याध्यक्ष - ६० पूर्ण | -श्री. श्री. वि. करंदीकर | ३ |
| २) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना (उत्तरार्ध) | श्री. यशवंत साने | ५ |
| ३) | स्टोन फॉरेस्ट: निसर्गाची किमया | डॉ. सुधाकर आगरकर | १० |
| ४) | सूर्योपासना (लेखांक पाचवा) | श्री. शं.बा. मठ | १५ |
| ५) | 'होळकरशाहीच्या इतिहाची साधने खंड २' साठी दोन प्रस्तावना | लेखन व संकलनः सुनीता गणपुले | १९ |
| ६) | आमची चीन यात्रा | सौ. अपर्णा सतीश भोळे | २५ |
| ७) | 'कृष्णभक्ती' | सौ. मालती मधुकर देवधर | २८ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# डॉ. विजय बेडेकर, कार्याध्यक्ष
## - ६० पूर्ण -

*आमचे प्रेरणास्थान असणारे डॉ. विजय बेडेकर यांनी ९ ऑक्टोबर रोजी ६० वर्षे पूर्ण केली. डॉक्टरांचे कार्य खूप मोठे आहे. त्यांच्यावर खूप मोठा लेख लिहिता येईल. पण 'संपादक' या नात्याने ते त्यांना रुचणार नाही. सबब मंडळाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ कार्यकर्ते आण्णा तथा श्री.वि. करंदीकर यांचा हा छोटा लेख देत आहोत.- कार्यकारी संपादक*



आज ठाणे शहरातील विद्या प्रसारक मंडळ ही एक नामांकित शैक्षणिक संस्था वैभवाने उभी आहे. हे वैभव क्रियाशील कार्यकर्ते, विद्यार्थी व शिक्षक यांच्या संयुक्त सहकार्याने प्राप्त झाले. शिक्षणा- विषयी तळमळ, जिद्द, निस्वार्थीपणा व धडाडी याच्या जोरावरच हा प्रवास चालू आहे. संस्थेचे बीजारोपण १९३२ सालातील तर वाटचालीचा प्रारंभ १९३५ चा. १९५७ साली (कै.) डॉ. वा. ना. बेडेकरांनी संस्थेला नेतृत्व दिले आणि याचा प्रसार होत गेला.

त्यांचे सुपुत्र डॉ. विजय बेडेकर हे सध्या मंडळाचे कार्याध्यक्ष याच परंपरेतील एक तडफदार उत्साही, चारित्र्यसंपन्न व क्रियाशील व्यक्तिमत्त्व. दि. ९ ऑक्टोबर २००७ रोजी आपल्या वयाची ६० वर्षे पूर्ण करून ते ६१व्या वर्षात पदार्पण करीत आहेत.

डॉ. विजय बेडेकर यांनी १९७२ मधे MBBS, व १९७७ मधे स्त्रीरोग तज्ज्ञ अशा दोन पदव्या संपन्न केल्या. १९७३ पासूनच आपल्या वडिलांबरोबर ते या व्यवसायात गुंतले. त्यांना दोन मुले असून तेही याच व्यवसायात मग्न आहेत.

डॉक्टर विजय बेडेकर १९७३ मधे विद्या प्रसारक मंडळाचे सभासद झाले. एप्रिल १९८१ मधे त्यांना कार्यकारी मंडळावर नियुक्त करण्यात आले. जून २००१ मधे मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून ते निवडले गेले. आज पावेतो या पदाचा कार्यभाग ते यशस्वीपणे संभाळत आहेत.

डॉ. वा. ना. बेडेकर, संस्थेचे अध्यक्ष व विश्वस्त यांचे १४ एप्रिल २००४ ला दुःखद निधन झाल्यावर, रिक्तपदी डॉ. विजय बेडेकर यांची विश्वस्त म्हणूनही नेमणूक झाली. ते आता तहहयात या पदावर राहतीलच.

डॉ. विजय हे आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळून आहेत. समाजाचे आपण एक घटक आहोत व समाजाशी आपली काही बांधीलकी आहे. याची त्यांना जाण आहे. एरवी त्यांच्या मनाची पायाभरणी इतकी मजबूत आहे की ते लीलया यशाची व कर्तृत्वाची भक्कम इमारत उभी करू शकतात. कामातील धडाडी, कामाकडे पाहाण्याचा सकारात्मक दृष्टिकोन आणि सतत काम करण्याची उर्मी असा

त्रिवेणी संगम असलेले व्यक्तिमत्त्व व काम करून घेण्याची चतुराई, म्हणजे डॉ. विजय बेडेकर. तसेच त्यांची जिद्द वाखाणण्यासारखी आहे. कोणत्याही कार्यात आपला दृष्टिकोन योग्य मानून व चांगली संधी साधून त्याचे ते सोने करतात. विद्या प्रसारक मंडळाव्यतिरिक्त त्यांनी अनेक विविध क्षेत्रांत आपले योगदान दिले आहे. मुंबई, पुणे, ठाणे व साता समुद्रा पलिकडेही इंग्लंड, अमेरिका, चीन व अनेक इतर परदेशातही प्रसिद्ध साहित्यीक, संशोधक, ऐतिहासिक, पौराणिक व संस्कृतिक क्षेत्रातील नामांकित संस्थांचे ते पदाधिकारी आहेत. त्यांचा खास आवडता विषय व त्यांची अभिरुची म्हणजे पौर्वात्य देशांचा अभ्यास, इतिहास व संशोधन हा आहे. त्यांना सप्टेंबर २००६ मध्ये रॉयल ऐशियाटिक सोसायटी, लंडन, या संस्थेचे सभासदत्व लाभलेले आहे. ही एक अवघड व सहजासहजी न मिळणारी मानाची बाब आहे. आकाशवाणीवरील त्यांचे पौर्वात्य अभ्यास, प्राचीन वैद्यकीय विज्ञान शास्त्र-आयुर्वेद इ. सारख्या विविध विषयांवर केलेली भाषणे प्रसिद्ध आहेत. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंवाद, कार्यशाळा, अभ्यासक्रम, परिषदा व चर्चासत्रे अनेक कार्यक्रमांत सक्रिय भाग घेतला आहे. त्यांचे संशोधनात्मक कार्यही बरेच उल्लेखनीय आहे.

या वरील गोष्टींचा दांडगा अनुभव कनवटीस खोचून ते विद्या प्रसारक मंडळाच्या शाळा, महाविद्यालये, तंत्रनिकेतन, संगणक केंद्र, व्यवस्थापन विभाग व प्रगत अभ्यासक्रम केंद्र याकडे जातीने लक्ष देऊन नवनवीन कल्पना अमलात आणून अभ्यासक्रम राबवीत असतात. विद्यार्थी व शिक्षक यांच्या प्रगतीबद्दल ते सदोदित जागरूक असतात. समाजाला सर्वाधिक मोलाचे योगदान देणारा माणूस म्हणजे शिक्षक. समाजाचे भवितव्य घडविण्याच्या कामात शिक्षकांचा सहभाग सर्वात जास्त असतो. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण कार्यक्रमाला ते सर्वोच्च स्थान देतात. चारित्र्य संपन्नतेला सर्वोच्च आग्रक्रम देणारी शिक्षण पद्धती आपण अंगीकारणे अत्यावश्यक आहे; व सुजाण व सुबुद्ध नागरिक घडविणे हेच आपले उद्दिष्ट असायला हवे. बदलत्या जागतिक व सामाजिक गरजा लक्षात घेऊन या क्षेत्रात विविधता आणण्याचा त्यांचा कटाक्षाने आटापिटा चालू असतो.

गेल्या ७० वर्षात विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देणे हे संस्थेचे ध्येय अबाधितच आहे. यामुळे मंडळाचे स्थान या क्षेत्रात कायमच उच्च राहील व यशाची पताका अधिकाधिक ऊंच फडकत राहील.

म्हणतात ना, प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्रीची पाठराखण असते. ते काही खोटे नाही. त्यांना लाभलेली उच्च शिक्षित जीवन सहचरिणी सौ. सुमेधा यांचाही डॉ. विजय बेडेकरांच्या यशस्वी वाटचालीत मोलाचा वाटा आहे.

शेवटी ईश्वरचरणी हीच प्रार्थना की, हे परमेश्वरा डॉ. विजय बेडेकर व त्यांचे कुटुंबीय यांचे सर्वांचे कल्याण कर.

श्री. वि. करंदीकर
ज्येष्ठ कार्यकारी सभासद
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे.

•••

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना (उत्तरार्ध)

*जागे अभावी श्री. साने यांचा लेख मागील महिन्यात देता आला नव्हता. लेखाचा उत्तरार्ध येथे देत आहोत.*

- संपादक

महायोगी अरविंद म्हणताहेत :-


'प्रचंड रूपकाने भरलेला हा प्रास्ताविक भाग म्हणजे या उपनिषदाची गुरुकिल्ली होय. त्याच्या प्रतीकसृष्टीत प्रवेश केल्याशिवाय वेदान्त कल्पनांच्या बहुप्रसादवती नगरीचे प्रवेशद्वार आपल्याला हस्तगत होणार नाही. उपनिषदांच्या भाषेत, केवळ काव्य म्हणून काव्य आणि अलंकाराकरिता म्हणून अलंकार (Art for Art's Sake - My Comment) असे तुम्हांला कधीच आढळणार नाही. सकृद्दर्शनी केवळ रूपमालिकेमागे काही प्रयोजन आहे. <u>ही सर्व रूपके उपनिषकर्त्यांच्या स्वैर कल्पनेवर आधारलेली नसून, प्राचनितर वेदान्तातील सर्वमान्य साक्षात्कार कल्पनांवर आधारलेली आहेत.'</u>

आपल्या <u>'रूपक संकल्पनेच्या'</u> शोध प्रयत्नात आणखी काही पुरावे तपासू या.

डॉ. सुभाष काक, हे एक फिलॉसॉफर (अमेरिकेत स्थायिक), हे Antonio Nicolos काय म्हणतात तिकडे आपले लक्ष वेधतात :- Subhash Kak (Ref. The Asvamedha, The Rite and its Logic) [ISBN : 8/-208-18776]

'To see Rigveda as a book of Rituals, a Religio - Cultural mythology, or an esoteric spiritual document is merely to scratch its surface strucfure. He argues that one must take it as a lingunistic whole, with four languages of:

1. Non - Existence (असत्)
2. Existence (सत्)




चित्र नं २

3. Images and Sacrific (यज्ञ)
4. Embodied (ऋत) Vision (धी:)

He adds - "These four lauguages function as four spaces of discpurse, four ways of viewing the world, within which human action takes place and from which any statement in the text gains meaning.

The different languages of the Rgveda address the four different aspects of our reality;

1. Physical existence
2. Mind, cousciousuess, spirit,
3. Transformation, and
4. Embodrid Vision

The languoges of असत् and सत् also relate to the present and its creative renewal. These four aspects are inter dependent, So the languages required to describe them are context sensitive.

Like the Rigveda, Velic Sacrifice also (यज्ञसुद्धा) operates through several languages. Behind the dramas of the actual performance are several narrafives regarding non-existence, existence, change and embodied vision.

The performance picks up elements of these narratives as it goes along, rendering the performance esoteric and paradoxical."

ऋग्वेदांकडे ते एक धार्मिक क्रिया, पूजाअर्चा यांची पोथीपुस्तके किंवा धार्मिक सांस्कृतिक पुराणकथा अथवा गूढ आध्यात्मिक ग्रंथ असे पहाणे म्हणजे त्यांच्या रचना शास्त्र व मूल्यांवर एक ओरखाडा ओढणे ठरेल. तो अँटोनियो निकोलास असे आवर्जून सांगतो की ऋग्वेदांकडे एक संपूर्ण व एकात्म संवादी भाषा असे पाहून चार भागांमध्ये पहावयाला शिकावे लागेल.

१. असत् - अस्तित्व

२. सत् - अस्तित्व

३. प्रतिमा, प्रतीके व यज्ञ

४. देहांतर्गत बुद्दी (धी) ने पाहिलेले दृश्य

ह्या विश्वाकडे चार प्रकारच्या दृष्टीने त्याचे दर्शन घेणे होय. त्यांतील लिखित संहितांचा अर्थ ह्या चार प्रकाराने 'अर्थ उपलब्ध' करून देईल.

१. भौतिक अस्तित्व

२. मन, कॉन्शसनेस व आत्मा

३. योगिक धर्मांतर

४. देहबद्ध दर्शन

ही चारही दर्शने परस्परावलंबी आहेत. असे समजा, त्यामुळे आपेला संदर्भासहित व संवेदनाक्षम असे अर्थ लावण्याचे सामर्थ्य पैदा होईल.

त्याचप्रमाणे ऋग्वेदासारखेच यज्ञ व त्याच्या अंतर्भूत व अभिप्रेत असलेल्या सर्व क्रिया या सुद्धा अनेक भाषेसारख्याच अर्थगर्भित असतील. या पद्धतीच्या अवलोकनाने या संहितांना व वर्णनांना गुह्य, गूढ व विशेष आध्यात्मिक अधिकार, प्राप्त असतील.

आतां आपल्यापुढे भारतीय संस्कृतीतील व पाश्चात्य संस्कृतीतील दोन भाष्यकार आपआपल्या तर्कपद्धतींतून मार्गदर्शन करत आहेत. तुलना करा व तुम्हाला योग्य ती युक्ती वापरा!!

याचा सरळ सोपा अर्थ हा की मानव आज जो स्वत:कडे व या विश्वाच्या पसाऱ्याकडे व क्रियांकडे पहातो आहे ते भौतिक दर्शन हे 'पूर्ण सत्य' Ontological & objective Reality दर्शन नव्हे. तसे 'अश्व' ह्या रूपकामधून ध्वनित केलेल्या विश्वाच्या मूळ अनंत स्रोतात 'अशनाया मृत्यु:' म्हणजे 'क्षुधा म्हणजेच मृत्यू' ह्या अर्थाचे रहस्यही प्राप्त करू शकेल. उषा, सकाळ, संध्याकाळ, निशा या व जन्म, मृत्यू, पुनर्जन्म ह्या क्रियांची मूळ संकल्पना अनुभवू शकेल.

तसेच या विश्वाच्या मुळाशी जडतत्व नसून त्याचा 'देह' हा एक 'कालरूपी मनोमय वस्तू' आहे (Psychological Time Consciousnen) असे बघू शकेल. त्याचा पुढचा आविष्कार Space-Time दिक्काल रूपांत आहे. अष्टदिशा ह्या 'विश्वअश्वाच्या' बाजू आहेत. वगैरे वगैरे. ह्यामुळे हा यज्ञीय अश्व म्हणजे जडतत्वात आविष्कार पावणाऱ्या 'शक्तीचे प्रतीक होय. जड प्राकृतिक आविष्कार हा त्या अश्वाच्या प्रतीकरूपाचा गाभा होय

आणि म्हणूनच जी रूपके योजिली आहेत ती प्राय: स्थूल आणि जड अशा सृष्टीतील आहेत, पण त्यांचा संकलित, एकात्म हेतू वा उद्देश तुमची भौतिक, सीमित व बंदिस्त दृष्टी बदलून ऋत व सत्य दर्शन देणारी व्हावी [A Transformation of outlook] हा आहे. हा यज्ञ तुमच्या Consciousness गुणात्मकतेने व्हावयाला हवा आहे. भौतिक मानवाला ही 'दिव्य दृष्टी प्राप्त' करून देण्याचा हा एक 'यज्ञ-प्रयत्न' आहे. बहिर्गत कर्मकांडी शुष्क यज्ञ नव्हे!!

आता प्रश्न पडेल की रूपका (Symbolism) चा उपद्व्याप कशासाठी?



चित्र नं ३

रूपक संज्ञांची युक्ती कोणती?

ह्यावर सरळ साधे उत्तर असे की ह्या रूपकांतील जड वस्तूंशी आपले जे भावना, संवेदना, ज्ञान ह्यांचे संबंध आहेत त्यामुळे तुमच्या अंतर्गत असलेल्या दैवी रचना यंत्रांचा-देवतांचा (Energu) फायदा घेऊन त्यांच्या जागृती क्रियेने तुमच्या दृष्टीला, ज्ञानाला, कॉंशसनेसला हा 'बृहद अरण्यकातील सांकेतिक योजनेने' सत्य ज्ञानाची प्राप्ती करून देणे हाच होय.

एवढ्याने समाधान होणे हे वेदांवर व उपनिषदांवर श्रद्धा असणाऱ्या माणसाला पुरेसे आहे. पण, ज्या दूरवरच्या अंतरावर व किनाऱ्यावर आजचा भौतिक मानव उभा आहे त्याला आणखी 'कांही प्रश्न व उत्तरे' यांच्या सांखळीतून ओढत न्यावे लागेल!!

## केनोपनिषद व ऐतरेयोपनिषद

ह्यासाठी 'केनोपनिषदाचे' व ऐतरेयोपनिषद वाचन करावयाला हवे. माणूस हा आपली पांच ज्ञानेंद्रिये - मनाच्या आधारावर घेऊन विश्वाचा व्यापार बघतो आहे. पण, ही इंद्रिये बहिर्गत वृत्तीची-भौतिक ज्ञानाला अनुकूल एवढ्याच कर्तृत्वाची सध्याच्या नैसर्गिक अवस्थेत आहेत. कारण ह्या इंद्रियांच्या प्राथमिक ज्ञानामध्ये सत्य, गूढ ज्ञानाची क्षमता नाही, कारण त्यांच्या संवेदनांचा अर्थ लावणारे 'मन' हे 'भौतिक वृत्तीचे' आहे."Sense, however, is not or does not appear to be fundamental, it is only on instrumentation of mind using the nervous system.

हे ऐंद्रिय ज्ञान माणसाच्या भावनात्म यंत्रणेवर अवलंबून रहाते - मानसिक व शारिरीक सिस्टीमवर!! नव्हे त्या सिस्टिमनध्ये प्रवाह यंत्रणा ही प्राणशक्तीची आहे. हा प्राणच चैतन्यशक्तीचा अविष्कार आहे.

त्यामुळे समोरचे चित्र, शिल्प, दृश्य, आवाज, गंध, स्पर्श, चव ही संवेदना सुरुवातीला एखाद्या यंत्रवत Mechanical पद्धतीने 'रिपोर्ट' देते. त्यानंतर ह्या भौतिक क्षमतेच्या मनाने त्याचा अर्थ प्राप्त होतो. तो अर्थातच 'सत्य' धारणेचा, क्षमतेचा नसतो. कारण ह्या 'मनाच्या क्षमतेचा, कुवतीचा, मर्यादांचा अभ्यास भौतिकशास्त्रात अत्यंत अल्प व तोकडा व 'सांप्रदायिक' म्हणजे 'भौतिक पॅरडिममध्ये, बंदिस्त व पूर्वग्रही आहे. आतां या प्राथमिक संवेदना ह्या जर 'भौतिक वृत्तीने 'फॉर्म', 'रूपाचे' वर्णन करणाऱ्या मानल्या तरी त्यांचे 'Triple process of

Transformation' मध्ये रिपोर्टिंग होते. प्रथम Physical nervous or Energy - Image and Third Image reproduced in stuft of mind.

दृष्टिचे चार Filters

परंतु खऱ्या अर्थाने मनाला चार आवश्यक अशी सामर्थ्ये आहेत- यंत्रणा आहेत. इतर उपनिषदे व केन उपनिषद ह्या चार संज्ञा, खालीलप्रमाणे सांगतात.

'विज्ञान, प्रज्ञान, संज्ञान, आज्ञान.'

**Vijnana** is the original consciousness which holds an image of things at once in its essence.

**Prajnana** is the consciousness which holds an image of things before it as an object with which it has to enter into relations and to possess by apprehension and a combined analytic and synthetic cognition.

**Sanjana** is the contact of consciousness with an image of things by which there is a sensible possession of it in its substance. It can be described as inbringing movement of approchensive which draws the object placed before it back to itself so as to possess it in conscions substance. **Prajnana** in turn is an outgsing movement.

**Ajnana** is the operation by which consciousners dowells on as image of things so as to hold, govern and possess it in power.

**These** four are the basis of all conscious action.

हे वर्णन मी मुद्दामच अरविंदांच्या शब्दात उपलब्ध केले आहे 'The upanishads' ह्या त्यांच्या इंग्रजी पुस्तकात 'केन उपनिषदावर' त्यांचे हे भाष्य आहे ते मला अत्यंत मार्मिक, स्पष्ट व मार्गदर्शक वाटले.

त्यांच्याच शब्दांत त्याचे पुढील वर्णन मात्र मी मराठीत सांगण्याचा प्रयत्न करतो आहे व तो आपल्या Symbol व त्यापासून होणाऱ्या आध्यात्मिक ज्ञानाला अत्यंत पोषक वाटला आहे.

प्रथम म्हणजे ही जी ज्ञानेंद्रिय म्हणजे नेत्र, श्रोत्र, स्पर्श व रस, गंध जी ह्या भौतिक मानवाला जन्मत: प्राप्त आहेत ती पृथ्वीवर घडलेल्या उत्क्रांतिमध्ये (Darwin सारख्या वर्णनातील) प्राप्त किंवा निर्माण झाली नाहीत. 'Terrestrial Evolution' मार्फत नाहीत. त्यांचा भौतिक वापर आपण पहातो व सहजपणे करतो, पण त्यांच्या वैश्विक सामर्थ्यामध्ये ती शरीराशिवाय त्यांची क्रिया करू शकतात. ती विश्वमनाची सामर्थ्ये आहेत.

'सज्ञान', विशेषत: ह्या गुणाने युक्त आहे. 'चैतन्य स्पंद' ही त्यांची ज्ञान ग्राहक शक्ति आहे.

एवढेच नव्हे तर ज्या बहिर्गत वस्तू, घटना चित्रे, आवाज, गंध, स्पर्श ह्या चीजा मानव ग्रहण करून ज्ञानाची बांधणी करते ती सर्व नाम रूपे 'Forms' हे ही ह्याच चैतन्य शक्तिचा अविष्कार किंवा व्यक्त स्वरूप वा Manifestation आहे. शिवाय हे 'फॉर्मस' व मानवाच्या किंवा प्राण्यांच्या अंतर्गत संवेदनाक्षमता ह्या परस्पर संबधाने, ज्ञानाने संवेदना क्षमतेने बांधलेल्याच आहेत.

'देवात्मशक्तिम् स्वगुणैर्निगूढाम'

self-power of the divine existent hidden by its own modes श्वेताश्वर उपनिषद (१.३)

Practically, therefore, all 'form' is only an operation of consciousness impressing itself with presentations of its own workings.

Movement of conscious being as knowledge becoming sensible of itself as movement of force, in other words the knowledge separating itself from its own working to watch that and take it into itself again by feeling this is the basis of universal 'Janinana'. This is true

both of our internal and external operations.

थोडक्यात म्हणजे ह्या पृथ्वीवर जन्माला येणाऱ्या जीवात्म्याला काही प्राथमिक स्वरूपांची क्षमता असलेली इंद्रिये त्याच्या Body form शरीररचनामध्ये प्राप्त झालेली आहेत. पण, ही इंद्रिये ही ह्या भौतिकामध्ये जरी आपल्याला दिसत असली तरी ती इंद्रिये वैश्विक संकल्पनेमध्ये त्या तत्त्वांच्या रूपाने अगोदरच अनंतकाळापर्यंत उपलब्ध आहेत. ती 'परमेश्वर स्वरूप' आहेत. व त्यांची क्षमता ही विश्वरचनेचा एक अविभाज्य भागच आहे.

### Ultimate Realisation अंतिम अनुभूती

मग, आतां 'अश्वमेध यज्ञ' व हा 'अश्व' ह्या संकल्पनेच्या मार्फत हे बृहदअरण्यक उपनिषद आपल्याला कुठले ज्ञान देत आहे?

हा 'अश्व' देखील एक रूप form आहे - जसा मानवदेह तसाच!! ह्या दोन्हींची निर्मीती ही एकाच शक्तीची सृजनशक्तीची क्रिया आहे. ह्या दोन्ही फॉर्ममध्येच एक गूढ संवाद, सुसंवादाचीही योजना आहे. ह्या अश्वाकडे जर एक चालती बोलती 'Symbol' प्रतीक म्हणून पाहिले तर त्यांतील वैश्विक रचनेचा, Wisdom ज्ञानाची प्राप्ति होऊ शकेल. ह्या विश्वाच्या अनेक व्यवहारांचा व व्यापाराचा विशेषत: 'अशनाया मृत्यूः' ह्या संकल्पनेचा बोध घ्यावयाचा असल्यासही ह्या 'अश्व' रूपकाची मदत होऊ शकेल. मग त्यासाठी ऐतरेय उपनिषदातील संज्ञान, अज्ञान, विज्ञान, प्रज्ञान व इतर योजनांची जाणीव करून घेणे व त्याचा योग्य व उच्चतर पद्धतीने उपयोग करणे आवश्यक ठरावे.

'यदेतद्‌धृयं मनश्चैतत्। सज्ञानमाज्ञानं विज्ञान प्रज्ञान मेधा दृष्टिधृतिर्मनोषा जूति: स्मृति। संकल्प:क्रतुरसु: कामो वश इति सर्वाण्येवेतानि प्रज्ञानस्य भवन्ति॥३॥१॥२।

अशनाया मृत्यू:

या उपनिषदाची अंतिम कल्पना म्हणजे 'अशनाया मृत्यू' हीच होय.

ह्या विश्वज्ञानाच्या या अश्वाचा सहोदर समुद्र होय, आणि याचे जन्मस्थानही समुद्रच होय. वेदांच्या 'पर-समुद्रांत' अथवा जडातीत 'कारणतत्वातच श्रेष्ठतर आणि दैवी जीवन प्रतिबिंबित झालेले असते. त्यांतूनच आपल्या जगताच्या 'अपर-समुद्राला' पाण्याचा (अपस्) त्याच्या प्रवाही शक्तींचा पुरवठा होतो, वृत्तांच्या वधानंतर आणि आकाशांच्या उद्‌घाटनानंतरच त्याला त्या उर्ध्वसमुद्रापासूनच नवे पाणी मिळते- 'प्रति समुद्रम् स्यन्दमाना:'। आणि आपला इहलोकरूपी समुद्र हा त्या उर्ध्वसमुद्राच्या परिस्थितीचीच मायेच्या राज्यातील छाया आणि प्रतिकृति होय.

अशनाया मृत्यू: ही माया-अपूर्णता दर्शनाची कल्पना होय. लहान माश्याला मोठा मासा खातो. एकाचे खाद्य दूसऱ्याचा मृत्यू!! खरोखरी आपल्यातील 'मर्त्यअंश' हा मूलद्रव्याच्या दृष्टीने, आपल्यातील अमर्याद, आणि अमर्त्य अशा अंगाचा बांधवच ठरतो.

इथे परार्ध व अपरार्ध संबंध ध्यानांत ठेवावयाला हवा.

आपल्यातील 'मर्त्य अंग' हा काय जातीचा आहे? हे कोडे कोणते?

बद्ध, मर्त्य व मर्यादित दिसणारे 'आपण' एका 'मुक्त आणि अमर्याद सत्याचे' अविष्कार आहोत.

अपरार्ध हा मूलत: परार्धाच्याच जातीचा ठरतो. मदत करतो!!

हा अश्व- 'विश्वअश्व' मानवाकरिता घोडा नव्हे 'अश्व' बनतो. उपनिषदातील द्वितीय ब्राह्मणाचा (अध्यायाचा)

(पृ. क्र. २४वर)

# स्टोन फॉरेस्टः निसर्गाची किमया

*चीन येथील शैक्षणिक सहलीत आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांसह गेलेले डॉ. सुधाकर आगरकर यांचा विशेष लेख. - संपादक*

आपल्या शेजारी असलेला चीन हा देश अनेक वैविध्याने नटलेला आहे. त्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण ठिकाण म्हणजे दगडाचे जंगल (Stone Forest) हे होय. युन्नान प्रांतातील कुनमिंग शहरापासून सुमारे १०० किलोमीटरवर असलेले हे ठिकाण पर्यटकांचे आकर्षणस्थळ ठरलेले आहे. युन्नान प्रांतात येणारे अनेक पर्यटक आवर्जून या ठिकाणाला भेट देतात. निसर्गाची किमया असेच या ठिकाणाचे वर्णन केले पाहिजे. आपण जमीन खोदायला लागलो की काही अंतरानंतर खडक लागतो. विहीर खणायला घेतल्यावर आपल्याला हा अनुभव नेहमीच येतो. काही ठिकाणी जमिनीच्या पृष्ठभागावर तुरळकपणे खडक आढळतात. परंतु दगडी जंगलात मोठ्या संख्येने जमिनीच्या पृष्ठभागावर खडक आढळतात. त्यांतील काही सुळक्यासारखे, काही प्राण्यांच्या आकाराचे तर काही एकावर एक रचून ठेवल्यासारखे वाटतात. या प्रेक्षणीय स्थळाला युनेस्कोने जागतिक वारसा ठिकाण (World Heritage Place) म्हणून गौरविलेले आहे. चीन सरकारने देखील हे ठिकाण सुशोभित करून पर्यटकांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने पर्यटक या ठिकाणी येतात. प्रत्येक पर्यटकाला प्रवेश शुल्क द्यावे लागते. त्यामुळे शासनाला उत्पन्न देखील मिळते.



**स्टोन फॉरेस्टमधील एक मनोहारी दृश्य**

स्टोन फॉरेस्टच्या प्रवेशद्वारापासून सुरुवात करून परत येईपर्यंत साधारणपणे ४ तास लागतात. या चार तासाच्या कालावधीत निसर्गाची किमया पाहून मन थक्क होते. त्याचबरोबर संपूर्ण परिसराचे केलेले सुशोभीकरण मन मोहून टाकते. युन्नान प्रांतातील जमातींच्या काही विशिष्ट चालीरीती आहेत. त्यांतील काही नृत्ये स्टोन फॉरेस्टमध्ये सादर करण्याचा प्रयत्न केलेला असतो. स्टोन फॉरेस्टच्या परिसरात प्रवेश करून काही अंतर पुढे गेल्यावर अशी नृत्ये सादर करणारे गट आपल्या नजरेला पडतात. येणाऱ्या पर्यटकांनी थोडा वेळ काढून या नृत्यांचा आस्वाद घ्यावा अशी अपेक्षा आहे. तरुण मुले मुली त्यांच्या पारंपरिक पोषाखात नृत्ये सादर करतात. त्यामुळे पर्यटकांना विरंगुळा प्राप्त होतो.




पारंपरिक नृत्य सादर करणारे चिनी नर्तक

युन्नान प्रांतातील जमातींचे पोषाख रंगीबेरंगी आणि मनमोहक असे आहेत. या पोषाखांचे पर्यटकांना आकर्षण असते. ही बाब ओळखून स्टोन फॉरेस्टच्या मध्यभागी पारंपरिक पोषाखांची देखील व्यवस्था केलेली आहे. आपल्याला पारंपरिक पोषाख पाहिजे असेल तर त्यासाठी शुल्क द्यावे लागते. चिनी स्त्रियांनी आपली लहान दुकाने थाटून अशा प्रकारच्या पोषाखांच्या काही प्रतींचा संग्रह करून ठेवलेला असतो. या परिसरात येणाऱ्या पर्यटकांच्या मागे लागून या स्त्रिया ग्राहक मिळवीत असतात. पुरुष आणि स्त्रियांसाठी वेगवेगळे पोषाख आहेत. एकदा आपण होकार दिला की या स्त्रिया आपल्या घातलेल्या कपड्यावरूनच पारंपरिक पोषाख घालतात. मुलगी किंवा स्त्री असेल तर तिच्या पाठीवर फुलांची परडी ठेवतात. मुलगा किंवा पुरुष असेल तर त्याला तलवार ठेवलेली म्यान देतात. अशा प्रकारे गणवेश परिधान करून आपले फोटो काढणारे अनेक पर्यटक या परिसरात भेटतात. काही मंडळी थोडा वेळ फेरफटका मारून येतात. काही जण तर स्टोन फॉरेस्टची संपूर्ण सहल होईपर्यंत हे गणवेश आपल्याकडेच ठेवतात. त्यासाठी अर्थातच जास्त शुल्क द्यावे लागते.



पारंपरिक पोषाखात भारतीय विद्यार्थी

मेजर फॉरेस्ट आणि मायनर फॉरेस्ट हे स्टोन फॉरेस्टचे दोन भाग आहेत. नावाप्रमाणेच मेजर फॉरेस्टचा आवाका मोठा तर मायनर फॉरेस्टचा आवाका लहान आहे. खडकाच्या जंगलातून अरुंद वाटेने मार्ग काढत जाणे हे तसे फारच जिकीरीचे काम आहे. काही ठिकाणी तर भीती वाटेल अशीच अवस्था आहे. जणू कोणीतरी मोठे दगड वर नेऊन ठेवले असावेत असा भास होतो. हे दगड अंगावर तर पडणार नाहीत ना अशी शंका येत राहते. काही ठिकाणी चढायला, उतरायला पायऱ्या केलेल्या आहेत. पावसाच्या दिवसात त्या निसरड्या झालेल्या असतात. त्यामुळे सांभाळून पावले टाकावी लागतात. त्यातल्या त्यात चांगली गोष्ट अशी की पर्यटकांचा लोंढा एकाच दिशेने जात असतो. त्यामुळे एकमेकावर आपटण्याची भीती नसते. परंतु गर्दी एवढी असते की गटातील सर्वांना एकत्र ठेवणे मात्र कठीण होते.



मायनर स्टोन फॉरेस्टमधील एक दृश्य

स्टोन फॉरेस्टमधील खडकांमध्ये बरीच विविधता आढळते. ते प्रामुख्याने गाळाचे खडक असल्याने त्यांच्यात अनेक स्तर आढळतात. विविध प्रकारचे आकार आणि आकृत्या ज्याच्यावर आहेत असे लहानलहान आकाराचे दगड तेथे विक्रीला ठेवलेले असतात. त्याचबरोबर विविध आकाराचे स्फटिक ज्यात आहेत असे दगडही विक्रीला असतात. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या दगडी जंगलातील वनस्पती. वनस्पतींच्या वाढीला आवश्यक असलेली माती तिथे नाही, सर्वत्र खडकांचेच साम्राज्य. असे जरी असले तरी तेथे अनेक प्रकारच्या वनस्पती वाढतात. पाणी आणि क्षारांच्या शोधात या वनस्पतींची मुळे खडकावरून खोल खोल जातात. खडकावर पसरलेली मुळे आपल्याला अनेक ठिकाणी पाहायला मिळतात. जगण्यासाठी वनस्पतींनी केलेली धडपड वाखाणण्याजोगी आहे. एवढी चिकाटी असलेल्या वनस्पतीं नामशेष करणाऱ्या मानवाचे मात्र नवल वाटत राहते.



जगण्यासाठी धडपडणारी खडकातील वनस्पती

मायनर फॉरेस्टच्या बाहेर पडताच आपण एका लहानशा मार्केटमध्ये प्रवेश करतो. या मार्केटमध्ये युन्नान प्रांतात बनवणाऱ्या अनेक कलाकुसरीच्या वस्तू विक्रीला ठेवलेल्या असतात. स्टोन फॉरेस्टमध्ये येणारे बरेचसे पर्यटक या मार्केटमध्ये खरेदी करतात. याहीपेक्षा महत्वाचे ठिकाण म्हणजे चित्रकला शाळा. या शाळेत प्रवेश करताच आपल्या लक्षात येते की तेथे अनेक प्रकारची चित्रे लावलेली आहेत. ही चित्रे इतकी सुबक आहेत की आपण थोडावेळ तेथेच थबकतो. एक चित्रकार तेथे चित्रे काढत असतो. आलेल्या गटासाठी तो चित्र काढून दाखवतो. चिनी लिपी ही चित्रांची लिपी आहे. ही लिपी मोठ्या आकारात लिहिणे याला 'कॅलिओग्रॉफी' असे म्हणतात. तेथील चित्रकार आपले कॅलिओग्राफीचे कौशल्य दाखवीत असतो. आपल्या दोन्ही हातात ब्रश घेऊन अत्यंत सफाईदारपणे हा चित्रकार अक्षरे काढतो. अशा पद्धतीने तयार केलेली चित्रे विक्रीला उपलब्ध असतात. या चित्रकाराचे वैशिष्ट्य असे की तो विद्यार्थ्यांना निःशुल्क चित्रे काढून देतो.



कॅलिओग्राफी करणारा चित्रकार

जमिनीच्या वर असलेले विविध आकाराचे खडक पाहून आम्ही काही अंतरावर गुहेत असलेल्या खडकांचे दृश्य पाहायला निघालो. हा अनुभव अगदीच वेगळा होता. जंगलातून खोल वाहणाऱ्या नदीच्या किनाऱ्यावर एक गुहा आहे. तेथे अनेक आकाराचे, अनेक रंगाचे खडक आहेत. गुहेत उतरण्यासाठी उद्‌वाहनाची सोय केलेली आहे. त्यानंतर साधारणपणे ६/७ किलोमीटर एवढे अंतर पायी चालावे लागते. पर्यटकांना सोयीचे व्हावे यासाठी एक दिशा मार्ग ठरविला आहे. नदीच्या किनारी खडकांच्या खालून वाट तयार केली आहे. जेथे नदी पार करावी लागते किंवा एका डोंगरावरून दुसऱ्या डोंगरावर जावे लागते तेथे पूल बांधलेले आहे. गुहेत अंधार असतो. परंतु महत्त्वाच्या खडकांवर विजेच्या दिव्याचा उजेड पाडलेला आहे. त्यामुळे खडकांचे सौंदर्य खुलून दिसते. खडकांत सौंदर्य निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या रंगाचे दिवे लावण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी पायवाट अतिशय अरुंद आहे. काही ठिकाणी ती घसरंडीदेखील आहेत. परंतु दोन्ही बाजूला दिसणारे निसर्गाचे सौंदर्य एवढे मनमोहक आहे की, या वाटेवर चालण्याचा काहीच त्रास जाणवत नाही.

खडकाच्या गुहेचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील दोन धबधबे. दोन वेगवेगळ्या लहान नद्या गुहेतच एकत्र येतात. त्यांच्या एकत्र येण्याच्या ठिकाणी मोठी उतरंड आहे. त्यामुळे दोन्ही नद्यांतून वाहणारे पाणी धबधब्याच्या रूपाने वेगाने खाली पडते. त्यातील एकाला स्त्री धबधबा तर दुसऱ्याला पुरुष धबधबा असे म्हणतात. दोन धबधब्यांच्या पाण्याचे रंग वेगवेगळे आहेत. खालच्या खडकावर जेव्हा हे पाणी आपटते तेव्हा मोठ्या प्रमाणावर फेस निर्माण होतो. या फेसात दोन पाण्याचे रंग गायब होतात. तिथून या दोन्ही नद्या एक होऊन वाहायला लागतात. धबधबा हेच त्यांच्या संगमाचे ठिकाण आहे. या धबधब्यावर पूल बांधून पर्यटकांना त्याचा आस्वाद घेण्याची व्यवस्था केलेली आहे. अनेक पर्यटक तेथे गर्दी करतात. अर्थात गर्दी करण्यासारखी अनेक ठिकाणे या गुहेत आहेत. गुहेच्या वरच्या पृष्ठभागाला चिकटलेले अनेक स्फटिक आपल्याला पाहायला मिळतात. त्याचबरोबर वर्षानुवर्षे पाण्याच्या ओघळण्याने खडकात वेगवेगळे आकार झालेले आहेत.


गुहेतच एक दुकान आहे. तेथे अनेक प्रकारचे स्फटिक आणि वेगवेगळे आकार असलेले लहानलहान दगड विक्रीला ठेवलेले असतात. या दुकानाच्या शेजारीच थकलेल्या पर्यटकांना विश्रांती घेण्याची सोय आहे. अशा विश्रांतीची गरज असल्याचे नंतरच्या कठिण मार्गावरून लक्षात येते. गुहेतील प्रवास संपवून बाहेर पडण्यासाठी सुमारे २५० पायऱ्या चढाव्या लागतात. एवढ्याने आपण पृष्ठभागावर येत नाही. जेथून आपण सुरुवात केली तेथे परत येण्यासाठी रोपवेच्या मदतीने यावे लागते. एका पाळण्यात दोन जण अशा पद्धतीने एका वेळेस ८० जणांना वर आणण्याची क्षमता या रोपवेमध्ये आहे. डोंगरदऱ्यातून हा मार्ग काढल्यामुळे रोपवेमधून प्रवास करताना खाली पाहिले असता दिसणारे दृश्य अतिशय मनोहारी दिसते. आपण शेवटच्या टप्प्याजवळ पोहोचतो तेव्हा आपला फोटो काढला जातो.

पाळण्यातून उतरून आपण बाहेर पडतो तेव्हा लगेच हा फोटो आपल्याला दाखविला जातो. आपल्याला

जर त्याची प्रत हवी असेल तर तसे सांगावे लागते. आपण नोंदणी केल्यावरोबर लगेच तो फोटो छापून आणि त्याला लॅमिनेट करून आपल्याला दिले जाते. एका फोटोची किंमत २० युहान (म्हणजे साधारपणे १२० रुपये) एवढी पडते.



गुहेतील धबधबा



रोप वे

उघड्यावरचे तसेच गुहेतले स्टोन फॉरेस्ट पाहिल्यावर निसर्गाचे हे आश्चर्य कसे निर्माण झाले असावे असा प्रश्न आपल्याला पडतो. भूगर्भशास्त्रज्ञांच्या मते आता जेथे स्टोन फॉरेस्ट आहे तेथे २५० दशलक्ष वर्षांपूर्वी एक विस्तीर्ण सागर होता. या सागरात गाळाचे खडक निर्माण झाले. कालांतराने जमिनीवरील खंडाच्या हालचालीमुळे हे खडक वर उचलले गेले. वर्षानुवर्षे त्यावर ऊन, वारा, पाऊस यांचा परिणाम होऊन त्यांची झीज झाली आणि आजचे स्वरूप प्राप्त झाले. काही का असेना स्टोन फॉरेस्टची भेट ही एक अविस्मरणीय भेट आहे हे मात्र खरे. कुनमिंगला गेलेली व्यक्ती जर स्टोन फॉरेस्टला न जाता परत येत असेल तर त्यांची सहल अर्धवट राहिली असे समजावे.

**डॉ. सुधाकर आगरकर**
४, अनिल को-ऑप. सोसायटी,
नगरपालिका प्राथमिक शाळेजवळ, काटेमनावली,
कल्याण (पूर्व)
दूरध्वनी: ९१-२५१-२३२२५२१
Email: s_agarkar@hotmail.com

**दिशासाठी**

आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञान क्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.

तरी आपणाकडून लेखन अपेक्षित आहे.

# सूर्य मन्दिरे
## (लेखांक पाचवा)

*सूर्य हे सर्व जगाचे, ब्रह्मांडाचे मूळ कारण आहे. त्यामुळे सूर्याला देवत्व देऊन सूर्यविषयक विचार माणसाने केला. या सूर्यदेवते संबंधातील श्री. मठ यांचा हा पुढील लेख.-* संपादक

वेदकाळापासून सूर्य ही देवता मानण्यात आली आहे. प्रारंभाच्या काळी इंद्र, अग्नि, वरूण आदी देवता प्रमुख होत्या. कालांतराने या दोनही देवतांचे महत्त्व वाढले. महाभारत काळी सूर्य देवतेची पूजा प्रचलित होती. कुषाण सम्राट सूर्यपूजक होते. कनिष्क राजा व त्याचे पूर्वज सूर्य पूजक होते. गुप्त सम्राट काळी (खिस्ताब्द ३ रे शतक) सूर्य शिव विष्णू या देवतांचे उल्लेख सापडतात. कुमार गुप्त याच्या वेळी या तीनही देवता विशेष रूपाने पूजल्या जाऊ लागल्या. स्कंद गुप्ताच्या वेळी या बुळंदशहर-इंद्रपुर-ग्रामी सूर्यमंदीर बांधण्यात आले. गुप्तसम्राट काळी सूर्य देवतेची आराधना होऊ लागली.

बंगाल येथे आजही सूर्य देवाची प्रतिमा उपलब्ध आहे. सातव्या शतकात हर्षवर्धन काळी सूर्यपूजा फार श्रेष्ठ मानली गेली. हर्षाचे पीताजी व त्यांचे पूर्वज केवळ सूर्याची उपासना करीत. बाणभट्टाने याचे वर्णन केले आहे. सूर्योदयी स्नान करून नियमित 'आदित्य हृदय' याचा तप करीत. या काळी सौर सांप्रदयाला प्रारंभ झाला असावा, असे मानावयास हरकत नाही. हर्षवर्धन काळी प्रयाग येथे तीन दिवस अधिवेशन झाले. पहिल्या दिवशी बुध्दाबद्दल, दुसऱ्या दिवशी सूर्याबद्दल व तिसऱ्या दिवशी शिवपूजनाबद्दल विचार करण्यात आला. ही सूर्य आराधना ११व्या शतकापर्यंत चालू होती. हर्षानंतर ललितादित्या मुस्कापीड नावाचा राजा सूर्य भक्त होता. त्यांनी मार्ताण्ड मंदिर बांधले. हे मंदिर मोठे होते, असे वर्णन आहे.

प्रतिहार सम्राट काळी सूर्यपूजा प्रचलित होती. ११व्या शतकाच्या आसपास प्रसिद्ध कोणार्क सूर्यमंदिर बांधले गेले. या वरून त्या काळी सूर्य उपासना मोठ्या प्रमाणावर होत असावी हेच ध्यानात येते. ११व्या शतकापर्यंत सूर्यदेव इतर देवतांपेक्षा अधिक उपास्य झाला. सूर्य प्रत्यक्ष भगवान आहे. विश्वातील पाचही तत्त्वावर त्यांचा अंमल आहे. सुरुवातीला याची उपासना मंत्रोक्त होती. सूर्य पूजनाला प्रारंभ झाला त्या वेळेपासून उपासना सूर्याच्या प्रतिमा निर्माण झाल्या. त्या मंदिरातून स्थापित करण्यात आल्या. उत्कळ प्रांतात सूर्य उपासना विषेश प्रचलित होती. कोणार्कला सूर्यमंदिर उभे राहिले त्याला कोणादित्य असे म्हणण्यात आले. आज हे मंदिर भग्नावस्थेत आहे. हे मंदिर अमरनाथच्या वाटेवर आहे.

विधर्मियांकडून अनेक मंदिरे नष्ट झाली असतानाही, अनेक ठिकाणी अद्याप सूर्यमंदिरे आहेत. आलमोड़ा येथील सूर्यमंदिर एक विशिष्ट मंदिर आहे. येथल्या मंदिरातील सूर्य प्रतिमा रथावर आरूढ नाही. शिवाय पायात पादत्राणे आहेत. कदाचित्त ही भारतीय चित्ररचना नसावी असे म्हणावेसे वाटते. देवलास इथे भव्य सूर्यमंदिर आहे. गयेला दक्षिणार्क मंदिर आहे. धर्मारण्य सिद्धपूर मढेरा या तीर्थक्षेत्री सूर्य देवतेची विशाल मंदिरे आहेत तसेच अयोध्या जयपूर व ओरिसा येथील सूर्यमंदिरे दर्शनीय आहेत. अलमोडा पहाडावर कटार मजली येथे सूर्यमंदिरे आहेत. या मंदिरातील सूर्यप्रतिमा कमळ पुष्पावर विराजित आहे.

राजस्थान येथील रणकपूर सूर्यमंदिर विशेष प्रसिद्ध आहे. राजस्थानी शैलीचे हे सुंदर मंदिर आहे. मध्यप्रदेशात खजुरहो येथेही सुंदर सूर्यमंदिर आहे. खंबायत खाडी-नगामा शहरी सूर्यमंदिर आहे. हे स्थापत्यदृष्ट्या प्रसिद्ध आहे. कुंभकोणम् येथील शिव मंदिराच्या बाजूस सूर्यमंदिर आहे. या वरून त्या काळी सूर्य उपासना मोठ्या प्रमाणावर होत असावी, हेच ध्यानात येते. ११व्या शतकापर्यंत सूर्यदेव इतर देवतापेक्षा अधिक उपास्य झाला.

बिहारात गया तीर्थाजवळ एक मोठे सरोवर आहे. याला सूर्यकुंड असे नाव आहे या कुंडाला चोहो बाजूंनी घाट बांधले आहेत. याच्या उत्तर भागी उदीची मध्यभागी करनलदक्षिण भागी दक्षिण मानस तीर्थक्षेत्र आहे. तीनही ठिकाणी तीन वेगवेगळे बुरूज आहेत. तिथे पिंडदान केले जाते. सूर्य कुंडाच्या पश्चिमेकडे एक मंदिर आहे त्या मंदिरात चर्तुभुज सूर्यनारायणाची मूर्ती आहे. तिला दक्षिणार्क अशी संज्ञा आहे. विष्णुपदपासून अर्ध्या मैलावर फलगु नदी आहे. तिथे गायत्री घाट आहे. या घाटाला ६८ पायऱ्या आहेत. अकरावी पायरी चढल्या वर गायत्री देवीचे मंदिर आहे. हे मंदिर व हा घाट ख्रिस्ताब्द १८०० साली सेठ खुशालचंद्र सैंधिया याच्या धर्मपत्नीने बांधला. गायत्री मंदिराच्या उत्तर दिशेला लक्ष्मीनारायण मंदिर आहे. व दक्षिण दिशेला सूर्यनारायणाचे विशाल मंदिर आहे. इथे चर्तुभुज मूर्ती आहे. याला लोक गयादित्य नावाने ओळखतात.

### नेपाळातील मंदिर

नेपाळात पशुपतिनाथ मंदिराच्या क्षेत्रात गुह्येश्वरी मंदिर आहे. या मंदिराशेजारी बागमती नदीच्या पूर्व किनाऱ्यावर सूर्य घाट आहे. तिथे सूर्याचे मंदिर होते. हे प्राचीन मंदिर नष्ट झाले. त्याच जागी छोटे मंदिर बांधण्यात आले आहे. इथे प्रतिमासी सप्तमास मेळा भरतो. या मंदिराचे महात्म्य असे सांगितले जाते की घाटावर स्नान करून सूर्य देवाला जो कोणी अर्ध्य प्रदान करील त्या व्यक्तीचे नेत्ररोग व चर्मरोग नाहीसे होतात. नेपाळात भक्तपूर नगरात एक सूर्य विनायक मूर्ती आहे ती चर्तुभुज आहे तिच्या डोक्याच्या चारीबाजुला किरणे आहेत. तिच्या तीन हातात शंख, चक्र, गदा आहेत. व चवथा वरदहस्त अभय मुद्रेत आहे. असे बोलले जाते की महारोगापासून सुटका होण्यासाठी कोण्या राजाने हे मंदिर बांधले आहे.

कर्नाटक - मतलगा -(कर्नाटक) इथे ४०० वर्षापूर्वीची एक सूर्यनारायणाची मूर्ती आहे. तिची उंची दोन फूट आहे. या मंदिरात रोज सूर्यसूक्ताचा पाठ होतो. हनुमान जयंतीच्या दिवशी पहाटे हनुमानाची पालखी या सूर्य मंदिरात येते. या सूर्य देवतेच्या उजव्या बाजुला जय व डाव्या बाजुला विजय यांच्या प्रतिमा आहेत. इथे सात घोड्यांची मूर्ती पण आहे.

### गुजरात - कच्छ - काठेवाड सह

कच्छ कन्थ कोट येथे नवव्या शतकात बांधलेले एकजीर्ण सूर्य मंदिर आहे. सौराष्ट्रात ११ व्या शतकातील भानमित्रेश्वर जवळ सूर्य मंदिर आहे. झालवाडा चोटीला स्थानी काठी समाजाचे एक नूतन मंदिर आहे. काठी समाज कट्टर सूर्योपासक आहे. साबरमती व हायपति या संगमा शेजारी विजापूर इथे सूर्याचे प्राचीन मंदिर आहे. त्याला कोट्यर्क (कोटी सूर्य) या विशेष नावाने ओळखतात. ते आज तीर्थक्षेत्र झाले आहे. जवळच एक सूर्यकुंड पण आहे. हे मंदिर नवव्या शतकातील असावे. उत्तर गुजरात (११ वे शतक) इथे विश्वविरण्यात मोदेरा सूर्य मंदिर आहे. मोढ वनिया व वैष्णव यांच्या इष्ट देवतेचे हे मंदिर आहे. हे मंदिर साधे व मोठे आहे.

भारताच्या पूर्वेस कोणार्क पश्चिमेला मोदेरा ही विश्वविख्यात मंदिरे मानली जातात. मात्र विधर्मी लोकांकडून ही नष्ट झाली. याच प्रमाणे काश्मीरचे मार्तंड

मंदिरही विधर्मीयांकडूनच नष्ट झाले. राजस्थानमधील जोधपूर मेवाड सरहद्दीवर जैन मंदिराजवळ अष्टभद्रयुक्त सुंदर व कलात्मक सूर्य मंदिर आहे. हे मंदिर उपेक्षिले गेल्याने जीर्णावस्थेत आहे. प्राचीन काळी प्रभास क्षेत्र सोमनाथ इथे छोटी मोठी सूर्य मंदिर होती. त्यांचे भग्न अवशेष इतस्ततः पसरले आहेत. सांप्रत दोन सूर्य मंदिर आहेत. तीही जीर्ण झालेली आहेत. त्रिवेणी येथील सूर्य मंदिराचे जीर्णोध्दार करण्यात आले आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख असून विशाल आहे. प्रभासनगराच्या ईशान्य दिशेला शीतला नामक स्थानी हिरण्य नदी किनारी राजवाडा पद्धतीचे एक सूर्य मंदिर आहे. त्याचे आज शिखर व छत नाहीसे झाले आहे. भिंतीवरील कलाकुसर अप्रतिम आहे. तिथे आज मूर्ती नाही. हे मंदिर दक्षिणाभिमुख आहे. प्रभास क्षेत्रास बारा सूर्य मंदिरे होती असे पुराणांवरुन कळते. त्यापैकी आज दोन खंडित मंदिरे दिसतात. विश्वकर्म्याची मुलगी संज्ञा हिच्याशी सूर्याचा विवाह झाला होता. परंतु सूर्याचे तेज तिला सहन न झाल्याने ती प्रभास क्षेत्री माहेरी आली. सूर्य तिला शोधत प्रभास क्षेत्री आला त्यावेळी आपली बारा रूपे त्यांनी प्रकट केले. त्यांची प्रतिके म्हणजे ही बारा मंदिरे होत असे म्हटले जाते.

**बारा रूपे**

आपल्या बारा रूपांनी सूर्य ब्रम्हांड व्यापून आहे ही बारा रूपे अशी आहेत, इंद्र-धाता- पर्जन्य, पूषा, अर्यमा, भग, विवस्थान, विष्णु, अंशुमान, वरूण, मित्र, व त्वष्टा, सूर्याच्या या नावांत वैज्ञानिक महत्त्व आहे. ही नावे उगाच देण्यात आलेली नाहीत. जगातील संपूर्ण भौतिक विकास सूर्य प्रभावावर निर्भर आहे. सूर्यावाचून वनस्पती उगवणार नाही तसेच वायू जळ ही देखील असणार नाही. या संपूर्ण विश्वाचा सूर्य हा केंद्रबिंदू आहे.

**परदेशीय यात्री**

चीनी यात्री ह्युएनत्संग याने लिहून ठेविले आहे की सातव्या शतकात मुळतान गावी सोन्याची मूर्ती असलेले सूर्य मंदिर होते. आल्बेरूनी याने ११ व्या शतकात हे मंदिर पाहिले होते. सुवर्ण मूर्ती लाकडी प्रतिकृतिने झाकून टाकली होती. विधर्मी लोकांच्या भयाने ही सुवर्णाची मूर्ती झाकून टाकण्यात आली. त्या वेळी इथल्या मंदिराचे पुजारी भग ब्राम्हण होते. ह्युएनत्संगने म्हटले आहे की कनोजला देखील सूर्य मंदिर होते.

वरील विवेचनावरुन उत्तर भारतात विशेष करुन सूर्य मंदिर होती असे म्हणावे लागते.

सूर्या संबधीच्या काही कथा

**सांब आदित्य कथा-**

एकदा देवर्षी नारद संचार करीत भगवान श्रीकृष्णाच्या दर्शनार्थ द्वारकेत आले. सर्वांनी त्यांचे स्वागत केले मात्र सांबाने केले नाही. सांबाचे हे वागणे नारदाला आवडले नाही. पुनः एकवार ते श्रीकृष्ण भेटीसाठी आले. त्यावेळी श्रीकृष्ण अंतःपुरात होते. बाहेर सांब होता. त्याला नारदानी आपण आल्याचा निरोप श्रीकृष्णास द्यावयास सांगितले. अंतपुरात जाणे म्हणजे श्रीकृष्णाचा रोष ओढवून घेणे, नाही गेल्यास नारदाचा रोष. परंतु मुनिरोषापेक्षा पित्याचा रोष पत्करला असे मनात आणून त्याने लांबूनच पित्यांना वंदन करून नारदाचे आगमन झाल्याचे कथन केले. तेवढ्यात नारदही पाठोपाठ आले. नारद श्रीकृष्णाला म्हणाले सांबाच्या सौंदर्यामुळे अंतःपुरात खळबळ उडाली आहे असे वाटते. हे ऐकून श्रीकृष्णाने सांबाला शाप दिला. तू कुष्ठ रोगी हो. एकतर अंतःपुरात येण्याचे धाडस केलेस, वर तुझ्या सौंदर्यामुळे अंतःपुरात खळबळ माजली. हा शाप ऐकून सांब थरथर कापू लागला. व वडीलांना त्याने विनविले. आपल्या पुत्राचे निरपराधित्व लक्षात येताच कृष्ण

म्हणाले हे पुत्र तू सूर्य देवाची आराधना कर. श्रीकृष्णाच्या सांगण्यावरून सांबाने काशीला जाऊन विश्वनाथाच्या देवाच्या पश्चिमेला कुंड रचून सूर्याची उपासना केली. आणि भयानक रोगातून मुक्त झाला. सूर्य देवाचे मंदिर सूर्य कुंडाशी विदयमान आहे. सांबादित्य तदारभ्य सर्वण्याधि हरः रविः। वदति सर्व भक्तीभ्यो अनामया : सर्व संपदः।

**द्रौपदी आदित्य कथा-**

दुर्योधनाच्या कुटील नीतीला बळी पडून पांडवांना द्युतात पराभव पत्करावा लागला. व परिणाम त्यांना बारा वर्षे वनवास भोगावा लागला. त्या अरण्यवासात अत्यंत दारुण परिस्थितीला तोंड द्यावे लागले. रक्षणासाठी द्रौपदीने सूर्याची उपासना केली. सूर्यदेव प्रसन्न झाले. त्याने द्रौपदीला एक थाळी दिली. जोवर तुझे भोजन होणार नाही तोवर या थाळीतील अन्न कधीही कमी पडणार नाही तुझ्या भोजनोत्तर ही थाळी रिकामी होईल. आदित्य कथा एतां द्रौपधाराधिस्यवे। यःश्रोष्यति नरो भक्त्या तस्यै न क्षयं एष्यति। ही आदित्य द्रौपदीची कथा भक्ती भावाने जो ऐकतो त्याला अन्न कधीही कमी पडणार नाही.

**स्यमंतमणि कथा-**

यदुकुळातील निदन नावाच्या राजाला प्रसेन व सत्राजित असे दोन मुलगे होते. हे दोनही मुलगे महान पराक्रमी योद्दे होते. एकदा पहाटे स्नान करून सूर्य उपासना करण्यासाठी सत्राजित समुद्र किनारी गेला. सूर्योपस्थानावेळी सूर्यदेव त्याच्या समोर उभे ठाकले सत्राजितला कोण आपल्या समोर उभे आहे हे ओळखता आले नाही. त्या रूपाला तो म्हणाला सूर्यदेवा नेहमी प्रमाणे तुला मी तेजो मंडळाच्या मध्यवर्ती असलेला पाहू शकेन. हे ऐकून सूर्यदेवाने आपल्या गळ्यातील स्यमंतकमणि बाजुला सारला. तेव्हा सूर्यदेवाचे सत्राजितला स्पष्ट दर्शन झाले.

सूर्याकडे सत्राजिताने त्या मणीची याचना केली. तो मणि प्राप्त होताच तो आपल्या गळ्यात धारण करून तो व्दारकेला आला. ज्याच्याकडे तो मणि राहील त्याच्या कुळात सोन्याचा पाऊस पडेल. मेघ वेळच्या वेळी वर्षाव करतील. रोगराईपासून तो भाग मुक्त होईल. सत्राजिताचा मृत्यू झाला, तो मणी श्रीकृष्णाजवळ असलेला पाहून त्याच्यावर मणी चोरण्याचा आळ आला. परंतु हा मणि श्रीकृष्णाला जाबुवंतापासून मिळाला होता. याचे कारण असे की एकदा सत्राजित अरण्यात हिंडत असता त्याला ठार करून जांबुवंत अरण्यात शिरला. श्रीकृष्णावर चोरीचा आळ आल्याने श्रीकृष्णाने मोठ्या परिश्रमाने जांबुवंताचा शोध घेतला. त्याच्याशी युध्द केले. त्याचा पराभव केला. श्रीकृष्णाच्या पराक्रमाणे खुष होऊन जांबुवंताने आपली मुलगी कृष्णाला अर्पण केली. व तिला आंदण म्हणून तो मणी श्रीकृष्णाला दिला. हे स्पष्ट केले त्यामुळे कृष्णावरील चोरीचा आळ नाहीसा झाला.

(समाप्त)

शं. बा. मठ

६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे ४०० ६०२.

•••

दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# 'होळकरशाहीच्या इतिहाची साधने - खंड २' साठी

## दोन प्रस्तावना: १ सौ. कमलाबाई किणे २. श्री. अ. ना. भागवत

*कमलाबाई किणे व अ.ना.भागवत यांच्या प्रस्तावनांतील महत्वाच्या भागांचे लेखन व संकलन या लेखात केले आहे. - संपादक*

प्रस्तावना: १

''मानवाच्या जन्माबरोबरच इतिहास जन्मतो. असा इतिहास चिरकाल राखणे, परिस्थितीचे मर्म ओळखून त्याचे संरक्षण करणे ही महत्त्वाची जबाबदारी भारतीय महिलांवर पडते. तसेच आपले घराणे, त्याचा इतिहास व तो तयार करणारे स्त्री-पुरुष यांचाही मननपूर्वक अभ्यास करून त्यातून विचार-रत्ने व कर्तव्यशील हिरे हुडकून त्यातील तेजस्विता पुढील पिढीसाठी जपावला हवी. अशी संधी दुर्मिळ असते. एव्हढ्या करता इतिहासाचे 'संरक्षण संवर्धन' करण्याची इच्छा स्त्रियांत उत्पन्न झाली पाहिजे.

गेल्या शतकातील स्त्रियांच्या इतिहासाचे अवलोकन केल्यास, देश-काल-परिस्थिती प्रमाणे त्या कार्यतत्पर होत्या हे इतिहास पुराव्याने सिद्ध होते.

उदाहरणार्थ 'घोड्यावर बसणे' ही एक कला असली तरी उच्च घराण्यापासून सामान्यांपर्यंत प्रवासात त्याकाळी घोड्याचा उपयोग करावा लागे.

दुसरे उदा.'भाषा व लिपी' यांचा वापर. साहित्यात 'मोडी लिपी' चा वापर असे. राज्यकर्ता ज्यावेळी जो असेल, ज्या भाषेचा वापर चालू असेल, ती भाषा शिकावी लागे. कथापुराणांच्या रूपाने राजकारण व समाजकारण व समाज बंधने कानी पडत. तसेच पुरुषांना पराक्रमाची संधी मिळे. त्यामुळे स्त्रिच्या नकळत वीर पत्नीत्त्वाची जबाबदारी त्या पार पाडीत.

ज्यावेळी देशात स्वतंत्रता असते त्याप्रसंगी त्या देशातील स्त्री-पुरुषांना गुणवान बनावेच लागते. हे इतिहास शिकवतो. त्यातही एकेकाळी स्वतंत्र, स्वाभिमानी, वैभवशाली व बहुमोल शील संपन्नता याबद्दल स्त्री-पुरुष प्रसिद्ध होते. देश स्वतंत्र असेल तर दुसऱ्याकडून उपदेश ऐकायला नको. अशा निसर्गदत्त देणगीमुळे स्त्री-पुरुषांकडून पुढील पिढी तेजस्वी निपजून पराक्रमी पुत्राचा जन्म होतो, त्या धनाची जोपासना राष्ट्र करते. राष्ट्र तयार करण्याची महत्त्वाकांक्षा मात्र हवी. देशातील अशिक्षितता परिस्थिती खालावलेली असल्यास स्वतंत्र होण्याची इच्छा हवी. तरच इष्ट ध्येय संपादन करता येते. इतिहासावरून हे शिकता येईल. ज्या राष्ट्राला इतिहास आहे ते 'राष्ट्र' म्हणावे.

आणि म्हणूनच हा थोर हेतू साध्य होण्यासाठी सौ. कमलाबाई किणे यांनी 'ऐतिहासिक स्त्रियांचा पत्र व्यवहार' हा भाग उपरोक्त ग्रंथातून छापण्याचा मानस व्यक्त केला आहे.

पूर्वजांची कृतज्ञता कशी व्यक्त केली जाते त्याबद्दल त्या लिहितात.

'जुना पत्र व्यवहार वाचला की त्या प्रकारचे 'मायने' वाचल्यावर स्वतंत्र देशातील व्यक्तींना किती मान व वैभव असे ते स्पष्टपणे नजरेस येते. कालमानानुसार त्यात भेद दिसून येतात. तरी मायन्यांची पद्धती, दर्जा, आदर यांचे उत्कृष्ट नमुने पहावयास मिळतात'.

'इतिहासातील महत्त्वाची लिपी 'मोडी' च्या अध्ययनाकडे हल्ली दुर्लक्ष झाले आहे. तिकडे मुला मुलींनी लक्ष पुरवावे. आपलेपणाने बघावे. जुनी लिपी म्हणून, हीन म्हणून तिरस्कार करू नये. इतिहासाची ती बहुमोल लिपी म्हणून पहावे. बऱ्यावाईटाचा विचार जरूर हवा. समाजाचे नुकसान नको. स्वाभिमान नसल्यास एक एक बाब नकळत मनुष्याला सोडून जाते. व खरे महत्त्व उशिरा कळते. पश्चाताप?'

सत्य इतिहास आपणास काय शिकवितात? जुन्या इतिहास परंपरेवरून, काळाच्या गरजेप्रमाणे स्त्रियांना ते वाकबगार करतात. गरजा कालमानाप्रमाणे बदलतात. चुका दाखविण्यापेक्षा नवे-जुने फरक पाहून प्रसंगावरून इतिहासाचे उदात्त तत्त्व शिकायचे. म्हणजे इतिहास सर्वांग सुंदर दिसेल. भावी पिढीला आजच शिक्षण हवे.

शीलवर्धन हे आद्य कर्तव्य. गरीबीत करारीपणा, कार्यतत्परता असेल तर वचक बसतो. सत्ताधिशाच्या अंगी तो मिळणे कठीण.

'पूर्वी अनेक घराणी वैभवात असून काळाच्या वक्र दृष्टीने लयाला गेली. 'ऐतिहासिक स्त्रियांच्या भागाला' मदत करण्याची कल्पना माझ्या मनात आली त्याला हेच कारण की, ज्या घराण्यात आपण इतका काळ कंठला, त्याविषयी वाटणारी कृतज्ञता साहित्य सेवेने भरून काढायची. व ऐतिहासिक पुरुषांचे उतराई व्हावे, ज्या विद्यमान राजस्त्रिया आहेत, त्यांनी राज्ञीपदा व्यतिरिक्त जनतेला सदुपयोग करून दाखवावा, हाच खरा मोठेपणा'.

आपले घराणे ज्या राजकारणी पुरुषांच्या चातुर्याने व स्वामीसेवेच्या उदार भक्तीने माळव्याच्या इतिहासात अजरामर झाले त्यांच्या स्वामी सेवेत आपली अंशमात्र सेवा रुजू व्हावी, या सद्हेतूने 'ऐतिहासिक स्त्रियांचा' भाग छापविण्यास कबूल झाले.

इंदूर दरबाराचे इतिहास संशोधक रा.रा.अनंत नारायण भागवत यांनी पत्रे देण्याची जोखीम पत्करून मीही ती प्रसिध्द करण्याचे कबूल केले. असा हा या भागाचा पूर्व इतिहास आहे. (खाली सौ. कमलाबाई किबे यांची सही आहे.)

प्रस्तावना:२

होळकर-शाहीच्या इतिहास लेखनाचे संशोधक व संपादक श्री. अ.ना. भागवत खंड २ च्या प्रस्तावनेत सांगतात-

''हे श्रेय श्री. सौ.कमलाबाई साहेब किबे यांच्या गुणग्राहकता, तत्परता, त्यांची इतिहासाविषयीची सद्भिरुची या गुणांसह आहे.''

सरकारी, खाजगी, जुनी दप्तरे यांचे संशोधन करून होळकरशाहीच्या विस्तृत इतिहासाची साधन सामग्री संग्रहित करण्याचे काम सुरु.. पत्र व्यवहार बराचसा उपलब्ध झाला असता.. प्रकाशनाची विवंचना जागृत असे.

गेल्या वर्षी खंड -१ प्रसिद्ध झाला.

खंडशः प्रसिद्धीचे वैशिष्ट्यपूर्ण खंड-

आजपर्यंतचे मराठ्यांच्या इतिहासाचे खंड प्रसिद्ध. तो पुरुषांनी पुरुषास लिहिलेला पत्रव्यवहार आहे. मात्र, 'होळकरांच्या इतिहास साधनांचा नवीन प्रकाशन खंड- होत आलेल्या खंडात जो पत्रव्यवहार प्रसिद्ध व्हावयाचा तो बहुतेक दोन तृतीयांश होळकर शाहीतील स्त्रियांनी-स्त्रियांस लिहिलेला' आहे. ही वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आहे.

'होळकर शाहीचे' मूळ संस्थापक थोरले मल्हारराव होळकर सुभेदार यांच्या वडील स्त्री गौतमाबाई पासून दुसरे तुकोजीराव महाराज, यांची स्त्री कै. भागीरथीबाई मा साहेब पर्यंत सुमारे दीड शतकात होळकर घराण्यात राजस्त्रिया होऊन गेल्या, त्यांचा आणि त्यांच्याशी ज्यांचा सरदार,

दरकदार, आश्रितया होत्या त्यांचा (४०/५०) - स्त्रियांच्या पत्रव्यवहाराने हा खंड भरलेला आहे.

यांत गौतमाबाईंची पत्रे फारच कमी असून 'देवी अहल्याबाई साहेब यांचा पत्र व्यवहार खंड' स्वतंत्रपणे अद्याप व्हावयाचे आहेत. त्यातील बराचसा भाग या खंडात समाविष्ट केला आहे.

बहुतेक स्त्रियांचा पत्रव्यवहार 'मोडी' लिपीतच आहे. इतकेच नव्हे तर शेवटी 'स्वतःची अक्षरे' -

'हे विनंती' 'हे विज्ञापना' 'बहुत काय लिहिणे' वगैरे 'मोडी' तच आहे. यावरून घरची, दरबारची, आणि व्यवहाराची 'भाषा मराठीच' व लिपी 'मोडीच 'होती. हे स्पष्ट दिसून येते.

यावरून गेल्या शतकात 'मोडी'ला किती मान होता व सांप्रत २० व्या शतकात खुद्द मराठी संस्थानात मराठी दरबारात अनास्था, दैना व हकालपट्टी करण्याचा कितीकांनी प्रयत्न चालविलेत. ते पाहून उद्वेगाने मराठी भाषेच्या अनास्थेबद्दल, अलद व सुलभ अशा मोडी लिपीच्या अभिमान शून्यतेबद्दल रडावे की काळाच्या वक्रगतीचे कौतुक करावे?... मातेलाच तिची मुले (थोर?) घराबाहेर काढीत आहेत... दोष कोणास द्यावा?

जी मातेची स्थिती तीच मातृभूमीची. का तर, परकी भाषेचे फाजील प्रेम - स्तोम - खूळ.

'ऐरिश' लोकांनी स्वराज्याचा झेंडा नुकताच उंच रोवला तेव्हा मातृभाषेत (ऐरिश भाषेत) त्यांना बोलता येत नाही अशी स्थिती होऊन लाजेने माना खाली गेल्या. तीच स्थिती मराठी संस्थानात? दरबारात?... विचार करा.

सांप्रत मुले, पुरुष यांना 'मोडी' येत नाही. मग स्त्रियांना तरी कशी यावी? सर्वाधिकारी, विद्याधिकारी, यांनाच ओळख नाही तर जनात पान्हा फुटणार कसा?

गेल्या शतकात भाषा व लिपी खालच्या दर्जातल्या दासीपर्यंत अवगत होती. तीच मराठी आपण बोलतो म्हणजे कमीपणाचे.. मोडी लिहीता वाचता न येणे हे एक भूषण, कौतुकाचे लक्षण मानले जाते.. यासाठी, किमान १ महिना लहानापासून थोरापर्यंत, राजापासून रंकापर्यंतचा खाजगी पत्रव्यवहार तपासून पहावा व खरे-खोटे पडताळावे.

इंग्लीश लोक असे करतात का? गरीबांची, मोठ्यांची, दरबारची भाषा-लिपी वेगळी. मग मराठ्यांनीच मराठीची दैना का करावी? यात अवहेलना, अनादर, भेदभाव दिसतो.

लेखकाचा समाजास ईशारा आहे की,

दुसऱ्यांच्या भाषेचा अनादर करू नये; तसेच मातृभाषेची अवहेलनाही करू नये. तिरस्कार व दैनाही करू नये.

संस्थान मराठी असूनही दरबारी भाषा फारशी, उर्दू, हिंदी अथवा इंग्रजी ही स्थिती स्तुत्य वाटते का?

गेल्या शतकात व सांप्रत काळात मराठी भाषा, मोडी लिपी यांच्या संबंधात जमीन अस्मानाचे अंतर पडले आहे. ते नाहीसे करण्याकरता विद्याधिकारी यांनी कसून प्रयत्न करायला हवेत.

न झाले तर काय होईल? .. दुष्परिणाम तत्काळ दिसून येणार नाहीत; परंतु लिपी गेली की तिच्या मागून भाषा जाणार, भाषा गेली की सर्वस्व गेले. ज्याचा सराव कायम तीच कायम. शेवटी दुर्दशा व निंदा ठेवलेली.

उदा. जपान-चीन-यांनी दुसऱ्यांचे चांगले घेतले. सुधारणा केल्या. कला कौशल्य घेतले परंतु मातृभाषा व अवजड लिपीव्दारे सर्वांना आपलेसे केले. यापासून आपण काहीच का शिकणार नाही!.. दुसऱ्याचे घ्यावे पण आपलेसे

करून घ्यावे. सर्वस्वी आहारी जाऊ नये. परावलंबन नको. मातृभाषा-लिपी संबधाने हयगय नको. मराठी म्हणविणाऱ्यांस लेखकाने विनंती केली आहे की,

'महाराष्ट्रीय ज्या ज्या प्रांती गेले, जेथे जेथे आपली राज्ये स्थापिली, संस्थाने स्थापिली तेथील रीतीभाती- आचार विचार आपल्यात सामावले ते सहज...तलवारीने नव्हे. उपयुक्ततेच्या वाटेने, मने जाणून..

मराठे माळव्यात पाऊल टाकताच तेथील हिंदीचा त्यांनी स्वीकार केला. हे इ.स. १७२५ पासून मराठी भाषा- मोडी लिपीतील पत्रव्यवहारावरून उपलब्ध होते. जुलुम- जबरदस्ती, सत्ता दुसऱ्यावर लादणे, अवहेलना करणे ही मराठ्यांची मनोवृत्तीच नव्हे...

मग मराठीला खड्यासारखी निराळी का काढावी? प्रांतस्थ हिंदु बंधुंनी गुर्जर, मालवीय, वैदर्भीय बंधुंनी असे का करावे? त्यांना त्यांची भाषा प्रिय तशी महाराष्ट्रीय मराठी भाषा-लिपी का असू नये?

काही झाले तरी, ५ वे ६ वे शतकातील सर्व प्रकारचे भांडार मराठी व मोडीत असे. तसेच बालबोधीत असे. प्रत्येकाने लक्षात ठेवावे, बाणेदारपणा,स्वाभिमान जरूर असावा परंतु भेदभाव स्पृश्यास्पृश्यता असू नये. असो.

प्रस्तुत खंडातील प्रत्यक्षातील सामग्री किती?

राजघराण्यातील बहुतेक-रखमाबाई, लाडाबाई, तुलसाबाई, कृष्णाबाई, गौतमाबाई, भागीरथीबाई, राधाबाई, भीमाबाई बुळे - मुख्य मुख्य स्त्रियांचा पत्रव्यवहार तसेच धारच्या मैनाबाई पवार, लक्ष्मीबाई शिंदे, बडवाणीची राणी, मथुराबाई फडणीस, वगैरे यांचा बाहेरच्या राजस्त्रिया, थोर स्त्रिया, यांच्याशी पत्रव्यवहार आहे. या शिवाय लाभांते, फणसे, वाघमारे, बुले, बाब, पिंगळे, शिंदे, रखमाबाई कीये या सरदार-दरकदार स्त्रियांचा ज्यांचा होळकर घराण्याशी कोणत्या ना कोणत्या रीतीने संबंध जडला आहे. तरी त्यांचाही बहुत पत्रव्यवहार दिला आहे.

यात स्त्रियांनी स्त्रियांस लिहिलेली, तसेच

पुरुषांनी स्त्रियांस लिहिलेली,

स्त्रियांनी पुरुषांस लिहीलेली, असाही पत्रव्यवहार आहे. तो सर्व मोडी लिपीतच आहे. हे विशेष

'बाळबोधधीत'ली पत्रे थोडी आहेत.

यावरून १८ व्या शतकात 'मोडीलिपी'चा प्रादुर्भाव किती होता, ती सर्वदूर सारखी प्रचलित होती, महत्त्व किती होते ते कळते. दक्षिणेस तंजावर पासून उत्तरेस नेपाळ, पूर्वेस बंगाल, आणि मद्रासपर्यंत कशी आपली विनी नेऊन पोचविली होती. व मराठी साम्राज्याप्रमाणे मराठी भाषेचे आणि मोडी लिपीने एकामागून एक प्रांत आक्रमून आपले पाऊल तेथे कसे उमटविले, स्थिर केले ते स्पष्ट दिसून येते, कळून येते.

दिल्ली, लखनौ, कलकत्ता, हैद्राबाद या ठिकाणी होळकर सरकारचे जे वकील होते. त्यांचा पत्रव्यवहार मोडी लिपीतच होता. तसेच कायस्थ लोक जे होळकर दरबारी चाकरीत होते तेही मराठी-मोडी शिकून तीत पत्रव्यवहार करीत. थोडाबहुत हिंदीतही होत होता.

स्वरूप - स्त्रियांच्या या पत्रात 'राजकीय गोष्टी' 'खाजगी गोष्टी' तसेच 'किरकोळ गोष्टी' नाही स्थान होते. त्यातून घडणाऱ्या ऐतिहासिक गोष्टींचा उल्लेख पहा-

रघुनाथराव दादासाहेब हे सुरतेस इ.स १७७५ त इंग्रजांच्या आश्रयास होते. नंतर हरिपंत फडके, पुणे दरबारी फौज घेऊन सोनगडावर छावणीस त्यांच्या पिच्छावर राहीले. यानंतर इंग्रज मराठी फौजांच्या हालचाली, त्यांची बातमी तुकोजीराजांची दुसरी स्त्री रखमाबाई यांना कारकून

नारोपंत लिहितो, त्यांत मिळते.

पद्मसी सावकार यांच्या दुकानी त्यांच्या सावकारी डाकेतून रोहिलखंडातील स्वारीची हकिकत, रामचंद्र गणेश यांचे व विसाजीपंताचे भांडण, होळकर फौजेचा व तुकोजीरावांचे मुकाम वगैरे संबंधाची हकीकत जी तिकडून येते ती तो सावकार महेश्वरास श्री.अहल्याबाई साहेबास कळवितो.

वढवाणीची राणी आपली कष्टप्रद हकिकत बाईसाहेबास महेश्वरीस कळवितो... अशी नोंद घेता येईल.

शिवाय मिरच्या, भाजी, संबंधानेही त्यांचे बारीक लक्ष असे. त्याचा उल्लेख पाहून बाईसाहेबांचा चौकसपणा कळतो. परस्पर संबंध कळतात. तसेच ऐतिहासिक गोष्टी कळण्याची ही साधनेच आहेत. म्हणूनच होळकरशाहीच्या इतिहासाची साधनेत समावेश केला.

पत्रव्यवहार करणाऱ्या स्त्रिचे हस्ताक्षर वळणावरून दर्जा कळतो. पत्राच्या सुरुवातीस श्री, कार, कुळदेव, नाव, विशिष्ट खूण, सही ऐवजी कोठेतरी दिलेली आहे. त्यावरून ते पत्र स्वतःचे की खाजगीतले ते कळते. पत्राशेवटी कुणीही सही केलेली नाही. (प्रथा नव्हती).

म्हणजे १८ व्या शतकात सहीची पद्धत नव्हती.

१९ व्या शतकात ती प्रचारात आली. व त्यानंतर प्रचलित आहे.

'हे विनंति' 'श्रीराम' यावरून अक्षरांची वळणे बरी असत. उदा. रखमाबाई होळकर, तुळसाबाई होळकर, रखमाबाई किणे फरक कळतो. अक्षरे वळणदार असत. (कारकुनाप्रमाणे) वाचता येत.निरनिराळ्या 'मायन्या' वरून त्यांची स्थिती, जात, वडीलपणा, धाकटेपणा समजतो. (सौ. कमलाबाई किणे प्रस्तावनेत उल्लेख)

स्वतंत्र खंड करण्याची मूळ कल्पना-

'राजस्त्रियांचा ऐतिहासिक पत्रव्यवहार' - हा

स्वतंत्र खंड करण्याच्या कल्पनेबद्दल ते लिहितात- " Letters of Queen Victoria", "Letters of life of Pro. Max Muller his wife"

यावरून सुचली. परंतु ग्रथस्वरूप देण्याचे श्रेय 'सौ.कमलाबाई किणे यांसच - त्यांच्या सांपत्तिक महनीय कामगिरी' शिवाय हे स्वरूप ग्रंथास देता आले नसते.

ऐतिहासिक पुरुषांचे स्मरण - त्यांची छत्री, तरवार, चिलखत, पागोटे, पादत्राणे, ढाल, अंगरखा, धनुष्यबाण, जुनी हस्तलिखित पत्रे , व वापरलेल्या वस्तू वगैरे पाहुन पूर्वजांबद्दल आदर अभिमान जागृत होतो. व तो कायम रहावा म्हणून संशोधन संग्रह जतन करण्याचा जगाचा प्रघात आहे.लंडन, कलकत्ता, मुंबई, सातारा, बडोदे, तंजावर, मद्रास, येथे लहान मोठी पदार्थ वस्तुसंग्रहालये ही साक्ष दर्शवितात.

पुणे भारतीय इतिहास संकलन मंडळाचे ऐतिहासिक वास्तूचे संग्रह करणे हेच काम असून ते पाहून विभूतींबद्दल आदर उत्पन्न होतो.

इंदूरला संत तुकोजीराव महाराज साहेब यांचे दोन वर्षापूर्वी विभूती भवन 'नर रत्नमंदीर' (Home of gentle-men) स्थापित झाले. त्यामुळे त्यांचे स्मरण ताजे रहाण्यास मदत होते. स्त्रियांसंबंधाने त्यांचे स्मरण जागृत करण्यासारखे काय? स्त्रियांसंदर्भात जी स्मारके आहेत ती अगदीच थोडी आहेत. 'सतीचे वृंदावन' 'सतीची छत्री' - पण ही संग्रहात ठेवण्यासारखी नव्हेत.

पदार्थ संग्रहालयात ठेवण्याजोग्या होळकर संग्रहालयातील गोष्टी-बादशहाजादीची फणी आहे.

पत्रव्यवहार ही जवळजवळ नाहीच. परंतु आता 'राजघराण्यातील स्त्रियांचा पत्रव्यवहार मिळवून तो

छापवून' प्रसिद्ध केल्यास वस्तु संग्रहालयात नवीन भरच पडणार आहे. तसेच ती अनासाये स्त्रीसमाजाची, होळकरशाहीची 'अल्पसेवा' केल्यासारखे होईल.

अशा उदात्त हेतूने, आदरणीय प्रेमादर भावनेने, अभिमान, स्वदेश प्रेमाने केलेली इतिहासाची ती पूजा, इ. गोष्टींनी प्रेरित होऊन सौ. कमलाबाई किणे यांनी या ग्रंथाला मूर्तस्वरूप देण्यासाठी तयारी दर्शविली... त्यांचे ऋण न विसरता येणारे आहे.

या खंडात होळकरशाहीतील राजस्त्रिया व संबंधित (३०/ ४०) मोठ्या दर्जापासून लहानसान इनामदारीणी पर्यंतच्या स्त्रियांचा पत्रव्यवहार असून-सुसंपन्न, सुशिक्षित, स्त्रिया आजही घराण्यास विभूषित करीत आहेत.

त्यांचे हे पुण्यस्मरण पुढील काळी स्त्रियांना जागृत करणारे ठरेल. तरी अंशतः अनुकरण व्हावे.

अशा प्रकारे स्त्री समाजाची सेवा, पूर्वजांविषयी इतिहास माहीत करून घेण्याची सद्‌भिरूची वाढावी ही यांची अपेक्षा.

(पत्ता-अनंत नारायण भागवत - होळकरशाहीचे इतिहास लेखक, संशोधक आणि संपादक . ता.२४.१०.२५.) ठिकाण -इंदूर इंद्रेश्वराचे देवालय.

लेखन व संकलनः सुनीता गणपुले

विकास कॉम्प्लेक्स, एल.बी. शास्त्री मार्ग

ठाणे(प.)४००६०१.

(पान क्र. ८ वरून)

**भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना (उत्तरार्ध)**

प्रारंभ ज्या 'अध्यात्म कल्पनेने होतो, त्या 'अशनाया मृत्यू' या कल्पनेकडे ऋषी वैचारिक पाऊले टाकतो व जे जरामरण रहस्य मानवी मनावर दडपणासारखे आहे- ते नष्ट करून ब्रह्मप्राप्तीच्या दिशेने आत्मविकास करणे व खरेखुरे 'अमृतस्य पुत्राः' होणे इकडे ज्ञानमार्ग विकसित होतो.

**Cosmic Wisdom वैश्विक संज्ञान आज्ञान**

ही 'अश्व' Symbol आपल्याशी बोलू शकते व त्या मार्फत केवळ अश्वाबद्दलच नव्हे तर ह्या गूढ विश्वाच्या रचना व अंतर्भूत शहाणपणा, ज्ञान, आत्मज्ञान प्राप्त होऊ शकते. हे अध्यात्म आहे.

**भौतिक प्रतिमा गोंधळ**

त्यामुळे ज्या राजकीय, सामाजिक धार्मिक Symbols च्या मार्फत समाजात फक्त वाद माजविण्यात येत आहेत त्या 'प्रतीकांचा' उपयोग आपल्या वैदिक, भारतीय संस्कृतीत कसा करण्यात येतो त्याचा एक नमूना ह्या लेखात मांडला आहे!

**पुढचा विषय**

आता पुढच्या अंकात ह्यावरच जास्त खोलावर विचार करण्यासाठी 'सोम, उध्वरित, क्रिया, पवमान सुक्त' ह्या काय संकल्पना आहेत ते बघू या.

यशवंत साने

सोनल अपार्टमेंट, २ मजला,

सारस्वत बँकेजवळ,अग्यारी लेन, ठाणे - १

दूरध्वनी क्र. २५३६८४५०,

ई-मेल yrsane@eth.net

# आमची चीन यात्रा...!!

*चीनमधील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात आमच्या आनंदीबाई जोशी विद्यालयमधील विद्यार्थ्यांचा प्रकल्प समाविष्ट होता. या निमित्ताने चीनमधील या प्रदर्शनासंबंधातील लेखमालिकेतील शेवटचा भाग. -संपादक*

राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या चीनमधील 'विज्ञान व तंत्रज्ञान नवनिर्माण' स्पर्धेत सहभागी होणाऱ्या आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांबरोबर आम्हा शिक्षिकांना जाण्याची संधी मिळाली. हा तर आमच्या दृष्टीने एक दुर्मिळ योगच होता!

चीन या देशाबद्दल मनात कुतूहल होतंच आणि तेथे जाण्याची संधी मिळाल्यावर ते आणखी वाढलं. युनान्त प्रांतांतील 'कुनमिंग' या राजधानीच्या शहरात एक भव्य इमारतीत हे प्रदर्शन मांडलेलं होतं. भारतासह एकूण आठ देशांना या प्रदर्शनात आपापले प्रकल्प सादर करण्यासाठी आमंत्रित केलेले होते. चीनमधील किशोरवयीन मुलांचे या प्रदर्शनात मांडलेले प्रकल्प पाहताना या मुलांच्या संशोधनाच्या बाबतीतील वैविध्य कौतुक वाटले; तीच्यानिमित्त :.. ... देशाच्या इतिहासात डोकावलं असता कितीतरी गोष्टींचे शोध प्रथम या देशात लागलेले आहेत; असं आढळलं. चहा, कागद, बंदुकीची दारु, बिडाचं लोखंड, पोलाद, लोखंडी नांगर, पोर्सलेनची भांडी, पुस्तकं, खेळातील पत्ते अशा कितीतरी गोष्टींचे शोध या देशाने लावले आहेत. चीननंतर जवळ जवळ १५०० वर्षानंतर युरोपात कागद वापरला जाऊ लागला. याच देशात ९व्या शतकात पहिला जागतिक धर्मग्रंथ, पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला. तेव्हा 'संशोधनाचे बीज' हे या मातीतच आहे; किंबहुना सातत्याने नव्याचा शोध घेत राहणं हा या मातीतच गुण असावा.



तरीही काही काळ सर्व जगापासून स्वतःला अलिप्त ठेवणारा हा देश थोडा सुस्तावला होता. आता मात्र तो खडबडून जागा झाला आहे. जागतिक स्पर्धेत स्वतःला विकसित राष्ट्रांच्या रांगेत बसवायचं असले तर पुन्हा एकदा मुसंडी मारुन विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झेप घ्यायला हवीय हे या देशाने ओळखलं आहे. त्यासाठी सध्याच्या शिक्षणक्रमांत, धोरणांत त्यांनी लक्षणीय बदल केलेले जाणवतात.

मुलांवर संशोधनाचे जाणिवपूर्वक संस्कार केलेले आढळतात. त्यासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा त्यांना पुरविण्यात येतात. अगदी लहान मुलांना मोडतोड करण्यासाठी शाळांमध्ये एक खास दालन ठेवलेलं असतं. मुलं तेथे येऊन प्रत्येक गोष्टीची (टी.व्ही., घड्याळं, संगणक, कॅमेरा इ.) मोडतोड करुन ती वस्तू कशी तयार केली आहे हे समजून घेतात. सुतारकाम, कुंभारकाम यासारखे व्यवसाय शिक्षण हे शाळेत असताना सहज शिकतात. नुसतं पुस्तकी शिक्षण हे कुचकामी असतं हे तिथल्या शिक्षणतज्ज्ञांना जाणवलयं. या प्रदर्शनानंतर ज्या प्रकारची बक्षिसं देऊन मुलांना प्रोत्साहित केलं गेलं , त्याला तोड नाही. सर्वोत्तम टीमला तर 'बीजिंग' सारख्या मान्यवर विद्यापीठात

प्रवेशपरीक्षेशिवाय प्रवेश देण्यात आला. वेगवेगळ्या कंपन्यांनी मुलांसाठी भरघोस बक्षिसं ठेवली होती.

आणखी एक गोष्ट जाणवली की शाळांमधील शिक्षण आणि शाळेबाहेरचं वातावरण यात तफावत नव्हती. पर्यावरण हा केवळ शिक्षणक्रमातील एक भाग नव्हता, तर तेथील सरकारही झाडांची निसर्गाची काळजी घेणारं होतं. रस्त्यावरील पानं गळलेल्या दोन झाडांना चक्क सलाईनद्वारे पोषणद्रव्यांचा पुरवठा केला जात होता. 'वृक्षवल्ली आम्हा सोयेरे...' म्हणणाऱ्या तुकारामांचा हा संदेश आपल्या देशात कितपत आचरणात आणला जात आहे. याबद्दल शंकाच आहे! आम्ही ज्या हॉटेलात उतरलो होतो तेथील रुममधील टेबलावर एक कार्ड ठेवलं होतं. त्यावर बेडकव्हर्स व बेडशीटस् जर रोज बदलल्या तर त्यासाठी बरंच पाणी वापरलं जातं, डीटर्जंटचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो त्यामुळे पाणी प्रदूषित होतं, तसंच वीजही खर्च होते जर हा अनावश्यक खर्च टाळण्यासाठी तुमची सहमती असेल तर दोन ते तीन दिवसांनी चादरी बदलल्या तर तुम्हाला चालणार असेल तर हे कार्ड तुमच्या बेडवर ठेवा म्हणजे तुम्ही नसताना जे कोणी चादरी बदलायला येथील त्यांना निरोप मिळेल. पर्यावरणाची काळजी घेण्याची ही पद्धत किती स्वागतार्ह आहे!!

कुनमिंग शहर बाराही महिने सुखद हवामान असलेलं व फळाफुलांनी, शेतांनी बहरलेलं शहर आहे. म्हणून या शहराला 'स्प्रिंग सिटी' असंही म्हटलं जातं. येथील रस्ते प्रशस्त, सहा पदरी असून त्याचं उत्तम सुशोभीकरण केलेलं आहे. रस्त्याच्या दुतर्फा सायकलींसाठी स्वतंत्र रस्ता तसेच हिरवळ व फुलांची सजावट असलेले अनेक मोठमोठे चौक आहेत. रस्त्यांचे दुभाजकही हिरवळीने नटलेले आहेत. या सर्व सार्वजनिक ठिकाणी, 'पानाफुलांना मन असतं, त्यांना दुखवू नका' अशा पाट्या लावलेल्या होत्या. मला बाबा आमटेंच्या आनंदवनाची आठवण झाली. तेथेही अशा अनेक पाट्या जगोजागी आढळतात.

कुनमिंगसारख्या छोट्या शहरातही मोठमोठ्या फुलांचं जाळं आढळलं. गेल्या १५ ते २० वर्षांत चीन सरकारने सर्व शहरांचा चेहरामोहरा बदलून टाकलेला जाणवत होतं. जुन्या वसाहतींच्या जागी नवनवीन इमारती बांधल्या जात होत्या. रुंद रस्ते, काही ठिकाणी तर तीन स्तरांवर पुलांची बांधणी केलेली होती. सर्व सार्वजनिक इमारती भव्य प्रमाणात बांधलेल्या होत्या.

शहराच्या बाहेर काही प्रेक्षणीय स्थळे बघण्याच्या निमित्ताने जाता आले; तेव्हा जाणवलं की इथे वसाहती व शेती यांचं अतिशय आदर्श पद्धतीने नियोजन केलेलं आहे. सर्व शेतीचं एकत्रीकरण केलेलं आहे व वसाहती एकत्र करून छोटी छोटी गावं निर्माण केलेली आहेत. वस्ती एकत्र आल्याने शाळा, हॉस्पिटल्स, वाचनालये, वीज, टेलीफोन या सर्व सुविधा पुरविणं हे शक्य झालं आहे. तसंच शेतीसाठीही छोटेसे रस्ते, यंत्रसामग्री या सुविधा पुरवलेल्या दिसत होत्या. या पार्श्वभूमीवर मला आपल्याकडची खेडी आठवली. चार पाच घरांच्या गावासाठी कोट्यावधी रुपये खर्चून तयार केलेले रस्ते, वीज, टेलीफोन आणि वर्षातील किमान आठ महिने रिकाम्या धावणाऱ्या एस्.टी. बसेस. डोळ्यांसमोर हे चित्र उभं राहिलं आणि जाणवलं की चीनमध्ये हे शक्य झालं, कारण तेथे सर्व मालमत्ता सरकारची आहे. शेतकरी भाडेतत्त्वावर जमिनी कसायला घेतात. कम्युनिष्ट या एकाच पक्षाचं राज्य असल्याने तेथे पक्षप्रचाराचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे रस्त्यांवर असंख्य मजकुरांचे फलक नाहीत. प्रचारसभा नाहीत. अधिवेशनं नाहीत. निवडणुकींसाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला जात नाही. अर्थात ही नाण्याची एकच बाजू आहे. दुसरी बाजू कदाचित सामान्य नागरिकांना जाचकच असू शकते!

चीनमध्ये व्यायामाला फार महत्त्व दिलेलं आढळलं. अर्थात या मागे एके काळी चीनचा सर्वासत्ताधीश माओ त्से तुंग याने राष्ट्राला सक्तीने व्यायाम करायला लावला होता. जवळ जवळ १५ वर्षे चीन राष्ट्रात एकाच वेळी व्यायाम केला जात होता. त्यामुळे व्यायामाची गोडी

लागणारी एक पीढी तयार झाली. आता सक्ती नाही तरी 'व्यायाम करणं' हे चिनी माणसाच्या रक्तात भिनलं आहे. त्याचेच परिणाम म्हणजे गेल्या काही दशकांतील चीनची ऑलिंपिक्स मधील कामगिरी! आज एक खेळाडू बाद झाला तर पुढे खेळाडूच्या लाटाच्या लाटा चीन देशात तयार आहेत. सुट्टीच्या दिवशी चौकाचौकातील मोकळ्या जागेत तरुणतरुणी व्यायाम करताना दिसत होते. सकाळी ऑफिसच्या व्हरांड्यात काही कर्मचारी व्यायाम करताना दिसले. तेथील व्यायाम व अन्न शिजविण्याची पद्धत या दोन्हींमुळे चीन देशातील माणसे आटोपशीर तब्येतीची दिसली. कोणीही स्थूल किंवा अति बारीक आसामी तेथे फारशी दिसली नाही.

चीनमधील वास्तव्यात एक गोष्ट ठळकपणे जाणवली, ती म्हणजे सर्वत्र स्त्रिया कष्टाची कामं करताना दिसत होत्या. मोठमोठ्या गाड्या चालवण्यापासून ते खांद्यावर भाज्यांची कावड घेऊन गल्लोगल्ली भाज्या विकण्यापर्यंत जास्त सहभाग स्त्रियांचा दिसत होता. दुकानं, हॉटेलं, बँका, फोटोग्राफी करणं या सगळ्या ठिकाणी बायकाच खपताना दिसत होत्या. चीनमधील अफाट लोकसंख्येला आळा घालण्यासाठी सरकारने फक्त 'एकच मूल' असण्याची सक्ती नागरिकांवर केलेली आहे. त्याला अपवाद दोनच, जर शेतकरी असले तर त्याला दोन मुलं असलेली चालतील किंवा ज्यांची १०,००० युआन (७०,०००/-रु.) दंड म्हणून सरकारला देण्याची क्षमता असेल त्यांना दुसरं मूल असण्यास हरकत नाही. कदाचित पुढच्या पिढीत नात्याच्या दृष्टीने थोडं नुकसान होण्याची शक्यता आहे. पण लोकसंख्या तर एकदम आटोक्यात येईल! कदाचित त्यानंतर काही नियम शिथिलही केले जातील.

चीनमध्ये सौर उर्जेचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात असलेला दिसला. सामान्यातल्या सामान्य घरावर देखील सौर उर्जेची उपकरणं लावलेली दिसत होती. शेतीसाठी जमिनीचा इंचभर तुकडाही वाया घालवलेला दिसत नव्हता. सर्वत्र हरितगृहांच्या रांगाच्या रांगा दिसत होत्या. कुनमिंग हे फुलाफळांच्या, भाज्यांच्या उत्पादनासाठी प्रसिद्धच आहे. सुखद हवामान व प्रेक्षणीय स्थळे यामुळे कुनमिंग हे पर्यटकांचं आवडतं शहर आहे. चीन सरकारने पर्यटकांची जास्तीत जास्त काळजी घेतलेली आहे. उत्तम बसेस, स्वच्छ प्रसाधनगृहे, अडचणीच्या जागीही उत्तम रस्ते, ठिकठिकाणी खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, एखाद्या मोठ्या बागेत फिरण्यासाठी बॅटरीवरच्या छोट्या बसेस अशा कितीतरी गोष्टी तेथे पर्यटकांसाठी पुरविलेल्या होत्या.

सर्वात लक्षात राहिलेली गोष्ट म्हणजे चिनी माणसांचा स्वभाव! भाषा कळत नव्हती पण बोलण्यात मार्दव जाणवतं होतं. आपआपसात बोलताना चांगली मोठ्याने बोलत होती पण परकीय माणसांशी बोलताना स्वर खालचा होता. कधीतरी आपल्याला 'इंग्रजी' बोलता येत नाही याचा 'खजील' भाव एखाद्याच्या चेहऱ्यावर दिसायचा. आम्हा भारतीयांसाठी खास स्वतंत्र 'डायनिंग हॉल' होता. शाकाहरी पदार्थांचा शोध घेऊन आम्हाला चांगल्यात चांगलं जेवण पुरविण्याचा त्यांचा प्रयत्न खरोखरचं स्तुत्य होता!

फक्त दहा दिवसांच्या या वास्तव्यात आम्ही त्या वातावरणाशी इतक्या एकरुप होऊन गेलो की, काही गोष्टी इथे आल्यावरही आमचा पाठपुरावा करीत होत्या. मी पॅग झी, जॅक्सन, ग्रेस, रीचर्ड या व्यक्ती अजूनही मनाच्या एका कोपऱ्यात ठाण देऊन बसलेल्या आहेत! कुनमिंग च्या विमानतळावरून विमानाने उड्डाण केलं आणि आमच्या ओठावर नकळत शब्द आले, 'गुडबाय चायना!!'

(समाप्त)

सौ. अपर्णा सतीश भोळे
A.M.B.A.
सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा,
नौपाडा, ठाणे- ४०० ६०२.

•••

# "कृष्णभक्ती"

*राम आणि कृष्ण हे भारतीय अस्तित्वाचे अविभाज्य भाग त्यातील कृष्णाबद्दल -संपादकीय*

**व्यवसायात्मिका बुद्धिरेकह कुरुनन्दन।**

**बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥**

'व्यवसायात्मिका बुद्धी' म्हणजे कृष्ण भावनेमध्ये त्यांची बुद्धी दृढनिश्चयी असते त्यांचे ध्येयही एकच म्हणजे कृष्णभक्ती हेच असते. कृष्ण भावनेद्वारे एखाद्याची जीवनाच्या परमोच्च सिद्धीप्रत उन्नती होऊ शकते या विश्वासालाच 'व्यवसायात्मिका बुद्धी' म्हटले जाते. परंतु हे प्रिय कुरुनन्दन जे लोक डळमळीत वृत्तीचे असतात त्यांच्या बुद्धीला अनेक फाटे फुटलेले असतात. ज्यांचे मन कृष्णभक्तीविषयी दृढनिश्चयी नाही त्यांची परमोच्च सिद्धीप्रत उन्नती होऊ शकत नाही. चैतन्य चरितामृतात असे सांगितले आहे की,



**'श्रद्धा-शब्दे-विश्वास कहेसुदृढविश्वय।**

**कृष्णे भक्ति कैले सर्वकर्म कृत हय॥**

श्रद्धा म्हणजे उदात्त गोष्टीवर दृढ विश्वास होय. जेव्हा मनुष्य कृष्ण भावनाभक्ती कर्म करू लागतो तेव्हा भौतिक जगाशी संबंधित असणाऱ्या वंशपरंपरा, मानवता किंवा राष्ट्रीयता इत्यादींच्या प्रती त्याने कोणतेही कर्तव्य करण्याची गरज नाही. गतकाळात केलेल्या शुभ किंवा अशुभ कार्यामुळे तो सकाम कर्मामध्ये मग्न होतो. जेव्हा त्याच्या मध्ये कृष्णभावना जागृत होते तेव्हा त्याला आपल्या कार्यामध्ये चांगले फळ मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता नाही. कृष्णभावना भावित कर्म हे चांगले आणि वाईट या द्वंद्वांच्या पलीकडे असते. जीवनाविषयीच्या भौतिक कल्पनेचा त्याग म्हणजेच कृष्ण भावनेची परमोच्च परिपूर्णता होय. कृष्ण भावनाभक्ती हा मनुष्याचा दृढसंकल्प ज्ञानावर आधारित असतो.

**वासुदेव: सर्वम् इति स महात्मा सुदुर्लभ:**

कृष्णभावना भावित व्यक्ती ही एक दुर्मिळ महात्मा आहे. कारण ती पूर्णतया जाणते की, वासुदेव किंवा श्रीकृष्ण हे अस्तित्वातील सर्व गोष्टींचे मूळ आहेत. ज्याप्रमाणे वृक्षाच्या मुळाशी पाणी घातल्यावर आपोआप ते सर्व पानांमध्ये आणि फांद्यामध्ये पोहोचते, त्याचप्रमाणे कृष्णभावनायुक्त कार्य केल्याने मनुष्य स्वत:चे कुटुंब, समाज, राष्ट्र, मानवता इत्यादींची सर्वोत्कृष्ट सेवा करू शकतो. एखाद्याच्या कर्मामुळे जर श्रीकृष्ण संतुष्ट झाले तर सर्वजण संतुष्ट होऊ शकतील. तथापि, कृष्णभावना युक्त सेवा ही आध्यात्मिक गुरुच्या योग्य मार्गदर्शनाखाली उत्तम प्रकारे होऊ शकते. श्रीकृष्णांचा प्रामाणिक प्रतिनिधी असलेल्या आध्यात्मिक गुरुला शिष्याचा स्वभाव माहीत असल्यामुळे तो शिष्याला कृष्णभावनाभक्ति कर्म करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करू शकतो. त्याचप्रमाणे कृष्णभावनायुक्त सेवा करून आध्यात्मिक गुरुंना संतुष्ट केल्याने पुरुषोत्तम श्रीभगवान संतुष्ट होतात.

सौ. मालती मधुकर देवधर

दूरध्वनी :- २५४०३४६०

# परिसर वार्ता

## विद्या प्रसारक मंडळ

विद्या प्रसारक मंडळाच्या स्वयंपूर्ण संस्थातून पदविका /पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षाप्रमाणे पदवी दान करण्याचा समारंभ दि. ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात संपन्न झाला.

दीप प्रज्ज्वलन व सरस्वती वंदनानंतर मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे स्वागतपर प्रस्ताविक झाले. या गौरवपूर्ण समारंभाची कल्पना स्पष्ट करून त्यांनी प्रमुख पाहुणे, ठाण्याचे पोलीस आयुक्त श्री. शिवानंदन यांचे व इतर मान्यवरांचे स्वागत केले. व्यासपीठावर मंडळाच्या सदस्यांसह घटक संस्थांचे प्रमुखही विराजमान होते.

सण आणि उत्सवांच्या माध्यमातून केले जाणारे राजकीय शक्तिप्रदर्शन व त्यातील राजकारणे आणि या सर्वांचा पोलीस संरक्षण यंत्रणेवर येणारा ताण याबद्दल त्यांनी विचार व्यक्त केले. सर्व यशस्वी स्नातकांना त्यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली. याच दिवशी डॉ. बेडेकर विद्यामंदिरात परंपरेनुसार शिक्षक दिनाचे आयोजन मंडळाने केल होते.

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर पूर्व प्राथमिक विभाग

बहरलेला श्रावण
हासरा, नाचरा...
सुंदर, साजरा,
सणांनी सजलेला,
संस्कृतीने बहरलेला असा हा

पूर्व प्राथमिक विभागात श्रावण महिन्यातील निरनिराळे सण उत्साहाने साजरे केले जातात. उदा.- गुरुपौर्णिमा, आषाढी एकादशी, दीपपूजा, नागपंचमी, श्रावणी शुक्रवार, रक्षाबंधन, गोपाळकाला, बैलपोळा, गौरी-गणपती इ.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी सर्व शिक्षकांनी मुलांना गुरुशिष्यांच्या गोष्टी सांगून गुरुंची महती सांगितली. या दिवशी प्रत्येक वर्गात 'गुरुब्रह्मा...' या श्लोकांचे फलक-लेखन केले होते. मुलांनी गुरुशिष्यांच्या जोड्या प्रत्यक्षात साकार केल्या होत्या. (उदा.- सांदीपनी-कृष्ण, रामदास-शिवाजी, द्रोणाचार्य-एकलव्य.)



गुरुपौर्णिमा



आषाढी एकादशी

आषाढी एकादशीला मोठ्या शिशुच्या सर्व मुलांची वारकऱ्यांच्या वेशभूषेत दिंडी काढण्यात आली. या दिंडीत

विठोबा-रखुमाई, ज्ञानेश्वर-मुक्ताई, सोपान-निवृत्ती असे निरागस चेहरे सामील झाले होते. तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी देखील उत्साहाने सामील होते.

दीपपूजेच्या दिवशी प्रत्येक वर्गात निरनिराळे दिवे मांडून त्यांचे महत्त्व मुलांना सांगण्यात आले. उदा.- लामणदिवा, मातीचा दिवा, पणती, समई इ. अंधाराकडून प्रकाशाकडे जाणाऱ्या दिव्यांची माहिती मुलांना सांगितली. दिव्यांच्या अमावस्येचे महत्त्व सांगणारे गाणे सांगितले.



'नागपंचमी'

नागपंचमीला वर्गात मातीचे वारुळ तयार करून त्यावर मातीचे नाग ठेवून नागाची पूजा केली व नागोबाची गाणी म्हटली. शिक्षकांनी सणाचे महत्त्व मुलांना सांगितले.

मोठ्या शिशुतील मुलांना गणपतीचा कारखाना बघायला नेले असता तेथील कामगारांनी गणपती तयार करण्यासाठी लागणारी शाडूची माती, साचा, प्लॅस्टर ऑफ पॅरीस, रंगकाम व वॉर्निशिंग इ.ची माहिती मुलांना दिली.

१५ ऑगस्ट रोजी शिक्षकांनी छोट्या टेबलावर झेंड्याचे चित्र काढून मुलांनी त्यावर सुयोग्य रंगाच्या फुलांनी सुशोभन केले. हा झेंडा बघायला सर्व लहान व मोठ्या शिशुची मुले आली; शिक्षकांनी मुलांना झेंड्याचे महत्त्व सांगितले. अशाप्रकारे स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.

श्रावणी शुक्रवारी सर्व मुलांना श्रावणी शुक्रवाराची माहिती सांगून जिवतीची पूजा केली व प्रसाद म्हणून सर्वांना चणे वाटले. ह्या दिवशी सर्व मुले नवीन रंगेबेरंगी कपडे घालून आली होती.

रक्षाबंधनाच्या दिवशी मुलींनी मुलांना राखी बांधली व मुलांनी मुलींना भेट म्हणून टिकल्यांची पाकीटे दिली. शिक्षकांनी मुलांना रक्षाबंधनाचे महत्त्व सविस्तर सांगितले.

दरवर्षीप्रमाणे विद्यालंकार सभागृहात दही-हंडी साजरी करण्यात आली. काही मुले कृष्ण व राधेच्या वेशभूषेत आली. दही-हंडी फोडल्यावर प्रसाद म्हणून दही-पोहे मुलांना देण्यात आले.

शिक्षक-दिनाच्या दिवशी पूर्व प्राथमिक विभातील काही शिक्षकांनी कै. वामनराव ओक रक्तपेढीवर रक्तदान केले. त्यामुळे रक्तपेढीने शाळेला कृतज्ञता प्रमाणपत्र समर्पित केले.

बैलपोळा साजरा करण्यासाठी वर्गात सजवलेल्या बैलजोड्या उभ्या करून मुलांना पोळा सणाची व बैलांची माहिती सांगितली. प्राण्यांबद्दलचा कृतज्ञता भाव व्यक्त करण्यासाठी अनेक सण-उत्सव आपण साजरे करतो.

गौरी-गणपतींमध्ये छोटी गणपतीची मूर्ती शाळेच्या गेटपासून वाजत-गाजत आणून मूर्तीची स्थापना केली. प्रसाद म्हणून लहान मोदक मुलांना देण्यात आला. सर्व वर्ग एकत्र करून गणपती विसर्जन व पर्यावरण याबद्दल सोप्या भाषेत माहिती सांगून बादलीमधील पाण्यात मातीच्या गणेशमूर्तीचे वाजत-गाजत विसर्जन केले.

असा हा हासरा, नाचरा श्रावण मुलांना सणांचे व संस्कृतीचे महत्त्व सांगून गेला.



गौरी-गणपती

### माध्यमिक विभाग

- शिक्षक दिनाचे (५ सप्टे.) औचित्य साधून शाळेतील शिक्षकांनी आपले समाजाशी असलेले नाते 'रक्तदान' करून दृढ केले. कै. वामनराव ओक रक्तपेढीमध्ये १४ शिक्षकांनी रक्तदान करून प्रतिवर्षी शिक्षक दिनाच्या दिवशी हे समाजपयोगी कार्य करण्याचा संकल्प केला.

- वि.प्र. मंडळाच्या सर्व शाखांतील अध्यापकांचा एकत्रित शिक्षकदिनाचा कार्यक्रम ५ सप्टे. रोजी संपन्न झाला. पालक श्री. रघुनाथ देशमुख यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. समारंभात गुणवान शिक्षकांसाठी दिला जाणारा 'कै. सुमतीबाई टिळू आदर्श शिक्षक पुरस्कार' डॉ. बेडेकर विद्यामंदिराच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांना देण्यात आला. जेष्ठ शिक्षक श्री. ज.रा. गवई यांचा २० वर्षांहून अधिक सेवाकाळासाठी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे ज्येष्ठ सभासद श्री.वि.करंदीकर होते.

- 'इंडो-अमेरिकन' सोसायटीतर्फे याच दिवशी इंग्रजी



श्री. ज.रा. गवई

speaking course विषयी इ.१० वी च्या मुलांना माहिती देण्यात आली. संगणकाच्या युगात इंग्रजी संभाषण कला व लेखन कला या दोन्ही अवगत असणे आवश्यक असल्याने संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या English Basic Course & English Advanced Course या विषयाची माहिती मुलांना देण्यात आली.

२२ सप्टे. रोजी सौ. ए.के.जोशी इंग्लिश मिडियम स्कूल येथे आयोजित Seminar on Teaching' Elementry Geography at school level' या उपक्रमांतर्गत खालील विषयांबद्दल विस्तृत माहिती दिली गेली. भूगोल विषयासाठी प्रयोगशाळेची आवश्यकता, अध्यापनात शैक्षणिक साहित्यांचा वापर, नकाशा वाचन, प्रात्यक्षिक पद्धतीचा वापर इ. विषयांवर चर्चा केली गेली. सत्रास श्री. वझे व सौ. धनगर उपस्थित होत्या.

- 'ब्राह्मण सेवा संघातर्फे' दरवर्षी गुणवंत शिक्षकांचा शिक्षक दिनानिमित्त गौरव करण्यात येतो. यावर्षी शाळेच्या शिक्षिका श्रीमती आशा जोशी यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



श्रीमती आशा जोशी

• ८ सप्टे. रोजी दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे 'अभियान प्रतिष्ठान' व 'ज्ञानसाधना महाविद्यालय' आयोजित चित्रकला शिक्षकांच्या कार्यशाळेस शाळेतील सौ. मंजिरी दांडेकर उपस्थित होत्या.

• १५ वी बालवैज्ञानिक परिषद २ ऑक्टो. रोजी श्री. सावित्रीदेवी थिराणी विद्या मंदिर, ठाणे येथे संपन्न झाली. त्यातील खालील प्रकारच्या प्रकल्पांची जिल्हास्तरीय पातळीवर निवड करण्यात आली.

1) Study of trees in Vishnunagar Area Rutija Chandrarao
2) Biodiversity - Sayali Khamkar
3) Study of snakes - Amod Pawar
4) Medicinal Plants - Pradnya Khot
5) Importance of habitat in biodiversity - Sagar Kadam

वरील प्रकल्पनां सौ. उज्ज्वला धोत्रे व श्री. शिरापुरी यांचे मार्गदर्शन लाभले.

• बाह्यपरीक्षा - 'नवभारत राष्ट्रीय ज्ञानपीठ' यांचेतर्फे घेण्यात येणारी राष्ट्रीय मराठी भाषा बुद्धिमत्ता शोध परीक्षा दि.१३ सप्टे. रोजी शाळेत घेण्यात आली. इ. ६ व ७ वी एकूण १३२ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. निकाल लवकरच अपेक्षित आहे.

• भरतकाम स्पर्धा - दि. १२ सप्टे. रोजी 'कोटस इंडीया लिमिटेड (अँकर)' तर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत एकूण १०५ विद्यार्थी सहभागी झाले. कु सायली कडव, कु.गौरी घोरखणकर, तृप्ती पालणकर यांना अनुक्रमे प्रथम, व्दितीय व तृतीय पारितोषिक मिळाले. तसेच दर्शन मोरे, मानसी शेट्टे व अभिषेक शिंदे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

• चित्रकला स्पर्धा - शुक्रवार दि. १४ सप्टे. रोजी पिडीलाइटतर्फे ''मी कोण होणार?'' या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित केली गेली. इ. ५ वी ते ७ वी चे सर्व विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले.

• शिष्यवृत्ती - राष्ट्रीय प्रज्ञा शोध (N.T.S) 2007 इ. ८वी साठी शाळेतील कु. अमेय सिद्धेश्वर गणमे याची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली.

• जलतरण स्पर्धा - शालेय जलतरण क्रीडा स्पर्धा दि. १६ सप्टे. रोजी विलेपार्ले येथे संपन्न झाल्या. शाळेतील ऑंकार कुचिक (८ड) याने स्पर्धेत १०० मीटर फ्री स्टाईल - सिल्व्हर मेडल व १०० मी. बटर फ्लाय - ब्रॉंझ पदक मिळवून देदीप्यमान यश मिळविले.

• निबंध स्पर्धा - 'रोटरॅक्ट क्लब ऑफ ठाणे नॉर्थ' तर्फे २३ सप्टे. रोजी घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत कौस्तुभ विलास वांबरकर यांस द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. स्पर्धेसाठी ऐनवेळी विषय दिले गेले.

• नृत्य व वक्तृत्व - कु. निधी संजीव प्रभू (८क) हिस 'हिंदू जागृती सार्वजनिक श्री. गणेशोत्सव मंडळातर्फे वैयक्तिक नृत्यस्पर्धेत प्रथम क्रमांकाचे तसेच 'संस्कृती कला दर्पण' आंतरशालेय कलागुण नैपुण्य स्पर्धेत वक्तृत्वासाठी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

• चित्रकला स्पर्धा - N.K.T. ट्रस्ट तर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत कु. मृण्मयी कोळी (८ अ) हिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

• जलतरण स्पर्धा - क्रीडा व युवक सेवा संचालनाय महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद कोल्हापूर (इचलकरंजी) यांनी ३ ऑ. रोजी आयोजित केलेल्या जलतरण स्पर्धेत कु. ऑंकार कुचित याला प्रशस्तीपत्र मिळाले.

• **सर्पमित्र मेळा** - सर्पमित्र श्री. कुवल व त्यांचे सहकारी यांनी दि. २९ सप्टे. रोजी इ. ६वी च्या विद्यार्थ्यांना धामण, दिवड, नाग इ. सर्प प्रत्यक्ष दाखवून विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

• **महात्मा गांधी जयंती** निमित्त 'जागतिक अहिंसा दिन' शाळेत साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी वर्ग व शाळेच परिसराची स्वच्छता केली. यावेळी झालेल्या कार्यक्रमात म. गांधींचे चरित्र व अहिंसा या विषयांवर सौ. धनगर, सौ. बोन्हाडे, श्री. जोशी, सौ. कारंडे-जोशी व सौ. माने यांनी दोन्ही विभागांत विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्रभारी मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांनी स्वच्छता, पर्यावरण आदी संदर्भात मुलांना गोष्टी सांगितल्या. सौ. सुमिता माने यांनी तयार केलेली 'अहिंसा शपथ' घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

• **निसर्गमेळा** - २ ऑक्टो. रोजी पी.ई. सोसायटी संचालित पर्यावरण शाळेने आयोजित निसर्ग मेळ्यात आठ विद्यार्थी व तीन शिक्षक सहभागी झाले. सर्वांना प्रशस्तिपत्रक देवून गौरविण्यात आले.

• **वृत्तपत्र** - 'Young Explore' हे इंग्रजी मासिक १०० विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयाचे ज्ञान, शब्द संपत्ती वाढविण्यासाठी सुरू केले आहे. हा एक नवीन उपक्रमाचा भाग आहे.

## आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा

• दि. २२ सप्टेंबर २००७ रोजी ठाणे येथील सौ. आनंदीबाई केशव जोशी या शाळेतील शिक्षकांनी इ.३री ते ८वी च्या अभ्यासक्रमातील भूगोल अध्यापन या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेचा लाभ विविध नामवंत शाळांतील २७ शिक्षकांनी घेतला होता.



भूगोल विषयाची कार्यशाळा

शाळेत तयार केल्या गेलेल्या 'भूगोल प्रयोगशाळेत' खगोलशास्त्राच्या संकल्पना स्पष्ट करणारी प्रात्यक्षिके भूगोल कार्यशाळेत करून दाखविली. उदा. पृथ्वीवर दिवस रात्र होणे, ऋतुचक्र चंद्राच्या कला इ. दिवसभराच्या या कार्यशाळेत शिक्षकांनी भूगोल शिक्षणात तंत्रज्ञानाची गरज, प्रयोगशाळेची गरज, नकाशावाचन इ. विषयांच्या अध्यापन पद्धतींवर सादरीकरण केले. प्रत्येक सादरीकरणानंतर प्रश्नोत्तरांसाठी काही वेळ दिला गेला.

दिवसअखेर कार्यशाळेला आलेल्या शिक्षकांनी योग्य प्रतिक्रिया लिहून पूर्ण समाधान व्यक्त केले. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर व QUEST चे संचालक श्री. नीलेश निमकर यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले.

## प्राथमिक विभाग

गणिताच्या (IMP) परिक्षेसाठी प्राथमिक विभागातून ९७ मुले परीक्षेस बसली व सर्व उत्तीर्ण झाली. निनाद मराठे याचा १८ वा व चैतन्य केळकर याचा ५९ वा नंबर आला.

## राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती - २००७

इ. ८वी च्या कु. आदित्य रानडेला २००७ ची राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती मिळाली.

गणित संबोध परीक्षेचा निकाल

| इ. | विशेष श्रेणी | प्रथम श्रेणी | व्दितीय श्रेणी | उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|
| ५वी | २ | २६ | १७ | १३ |
| ८वी | २ | ८ | ३ | ३ |

ठाणे तालुक्याच्या गुणवत्ता यादीत झळकलेल्या विद्यार्थ्यांची नावे

| इयत्ता | नाव | गुण | क्रमांक |
|---|---|---|---|
| इ.५वी | कु. इशा सामंत | ९२ | व्दितीय |
| इ.५वी | कु. सुम्मय अघारकर | ९२ | व्दितीय |
| इ.८वी | कु. वुपाली प्रसादे | ९२ | व्दितीय |
| इ.८वी | कु. कृणाल चौधरी | ९० | तृतीय |

२००६-२००७ च्या बालवीर राज्य पुरस्काराचा निकाल

राज्य पुरस्कार मिळवलेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे:

१. अभिलेष गोखले
२. संदेश शेट्टी
३. आदित्य सारंगधर
४. निनाद तकभाते
५. पराग लोंढे
७. अनिश तोरे
८. नवनीत सकपाळ

## जोशी बेडेकर महाविद्यालय

**दि. ६ ऑगस्ट २००७ ते १० सप्टेंबर २००७ या कालावधीत संपन्न झालेले कार्यक्रम :**

➢ बुधवार, दि. ८ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या जिमखान्याचे उद्‌घाटन प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग यांच्या हस्ते झाले. त्याच दिवशी 'Placement in Retail Industry' या विषयावर हायापर सिटीतर्फे श्री. शहा यांचे व्याख्यान 'कात्यायन' सभागृहात झाले.

➢ गुरुवार, दि. ९ ऑगस्ट रोजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या कला आणि वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन झाले या प्रसंगी अभिनेत्री समीरा गुजर प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होत्या.

➢ शनिवार, दि. ११ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात 'Friendship Day' साजरा करण्यात आला. या प्रसंगी मनोरंजनाचे विविध कार्यक्रम झाले.

➢ सोमवार, दि. १३ ऑगस्ट रोजी स्कॉलर्स अॅकॅडमी तर्फे प्रसिध्द अभिनेत्री महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनी सौ. संपदा जोगळेकर यांचे 'धावत्या जगाबरोबर मास मिडीया' या विषयावरील व्याख्यान 'कात्यायन' सभागृहात झाले.

➢ बुधवार दि. १५ ऑगस्ट रोजी मंडळाच्या सर्व शाळा, महाविद्यालयांचा एकत्रित स्वातंत्र्यदिन समारंभ महाविद्यालय परिसरात झाला. संस्थेचे विश्वस्त व कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. तसेच या प्रसंगी त्यानी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर चार शब्द सांगितले.

➢ मंगळवार, दि. २१ ऑगस्ट रोजी प्लेसमेंट सेल आयोजित 'Careers in Automobile Industry' या विषयावर श्री. विश्वनाथ यांचे व्याख्यान 'कात्यायन' सभागृहात झाले.

➢ शनिवार, दि.२५ ऑगस्ट रोजी कमिशनर ऑफ पोलिस डॉ. शिवानंदन यांचे 'Domestic Violance' या विषयावरील व्याख्यान 'थोरले बाजीराव पेशवे' सभागृहात संपन्न झाले. त्याच दिवशी सायंकाळी ४.३० वाजता थोरले बाजीराव

पेशवे सभागृहात 'इंटरनॅशनल फिल्म सोसायटी' तर्फे 'The Children of Heaven' हा इराणी चित्रपट इंग्रजी उपशीर्षकांसह दाखवण्यात आला.

- बुधवार दि. २९ ऑगस्ट रोजी मराठी विभागाच्या वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे लोकशाहीर श्री. विठ्ठल उमप यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी 'कलावंत आपल्या भेटीला' या सदरांतर्गत श्री. विठ्ठल उमप यांची मुलाखत मोरे सरांनी घेतली. 'थोरले बाजीराव पेशवे' सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात लावणी , भारूड, कोळी गीते इ. मराठी लोकगीतांचा नजराणा श्री. उमप यांनी सादर केला.
- शनिवार दि.१ सप्टेंबर रोजी विद्यार्थी प्रतिनिधी मंडळातर्फे श्री सत्यनारायणाची पूजा आयोजित करण्यात आली.
- त्याच दिवशी स्कॉलर्स ॲकॅडमीतर्फे डी.सी.पी. ज्ञानेश्वर चव्हाण यांचे 'Young Generation and Traffic Rules' या विषयावरील व्याख्यान 'कात्यायन' सभागृहात झाले. बुधवार दि.५ सप्टेंबर रोजी विद्यार्थी प्रतिनिधी मंडळातर्फे शिक्षक-दिन-समारंभ 'कात्यायन' सभागृहात झाला.
- गुरूवार दि.६ सप्टेंबर रोजी संस्कृत विभागातर्फे 'संस्कृत-दिन-समारंभ' आयोजित करण्यात आला. या प्रसंगी झुनझुनवाला महाविद्यालयाच्या संस्कृत प्राध्यापिका सौ. मृणालिनी कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी इ.११ वी व १२ वीच्या सुधारित अभ्यासक्रमाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### तंत्रनिकेतन

### विद्युत अभियांत्रिकी विभाग

राजीव गांधी अक्षय उर्जा दिवस वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतनाच्या विद्युत अभियांत्रिकी शाखेतर्फे साजरा करण्यात आला.

अपारंपारिक उर्जा विभागातर्फे २० ऑगस्ट हा दिवस अक्षय उर्जा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनाच्या विद्युत अभियांत्रिकी शाखेच्या Synergy Grop ने हा दिवस २१ ऑगस्ट थोरले बाजीराव पेशवे सभागृह, ठाणे येथे साजरा केला. या दिवसाचे औचित्य साधून राज्यपातळीवर तांत्रिक निबंध सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा महाराष्ट्रातील तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आली होती. अशा स्पर्धांचे आयोजन करण्यामागचा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये असलेले ज्ञान व नैपुण्य लोकांसमोर मांडण्यासाठी उत्तेजित करणे, उर्जा स्रोतांविषयी त्यांच्यामध्ये जाणीव करणे असा आहे.

आजकाल उर्जेविषयीची जाणीव सर्वच राष्ट्रांना झालेली असून प्रत्येक राष्ट्र हे या समस्येकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यायला लागले आहे. भारतासारख्या देशात उर्जेची समस्या उग्र होत चाललेली आहे. या समस्येची जाणीव लक्षात घेऊन काही पर्याय निर्माण करण्याविषयी वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन नेहमीच प्रयत्न करीत असते.

या कार्यक्रमाचे प्रायोजकत्व श्री. एस.एस. झेंडे, जिल्हाधिकारी ठाणे, महाराष्ट्र उर्जा विकास एजन्सी (MEDA) ठाणे व जिल्हा ग्रामीण विकास एजन्सी,ठाणे इत्यादी नामवंत संस्थानी स्विकारले होते. कार्यक्रमाची सुरूवात कौस्तुभ कुळकर्णी आणि सहकारी यांच्या सूर्य अराधनेने झाली. उद्‌घाटन श्री. गिरीष देशपांडे, (डायरेक्टर,

Energetics Co.Pvt. Ltd) ठाणे यांनी केले. श्री.एस.व्ही करंदीकर (विद्या प्रसारक मंडळ, ठाणे) कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. MEDA,चे प्रोजेक्ट ऑफीसर, शिवाजीराव वोडके, वि. प्र मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक तंत्रनिकेतनच्या विद्युत शाखेच्या विभाग प्रमुख सौ. एन. व्ही. वडेर इत्यादी उपस्थित होते. MEDA चे शिवाजीराव वोडके यांनी Synergy Group तर्फे पुढील वर्षापासुन राष्ट्रीय पातळीवरच्या उर्जेसंबंधी विषयाच्या स्पर्धांचे आयोजन करण्याचे सूचित केले. उर्जेसंबंधीची मते प्राचार्य दि.कृ. नायक यांनी व्यक्त केली. विभाग प्रमुख सौ.वडेर यांनी Synergy Groupची मते विशद केली. सौ. कुलकर्णी एस.एस.सेक्रेटरी Synergy Group यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास या क्षेत्रातील नामवंत व महाराष्ट्रातील विविध तंत्रनिकेतनांमधील विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. जवळ-जवळ २५ निबंध प्राप्त झाले होते. विविध विषयासंबंधीचे निबंध उदा:- पवन उर्जा जिओ थर्मल इनर्जी, उर्जा बचत सोलर वॉटर हिटर इत्यादी. परिक्षक म्हणून श्री. शिरीष देशपांडे,(डायरेक्टर Energentic कन्सल्टन्सी प्रा.लि.ठाणे) डॉ. रमेश काटे ( प्रा. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल विद्यापिठ, लोणेरे.) व सौ. सोमा दुबे (लेक्चरर बाबासाहेब गावडे तंत्रज्ञान संस्था, मुंबई) यांनी काम पाहिले. विषयाची निवड, माहितीची जमवाजमव, व सादरीकरण इत्यादी गोष्टीद्वारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले.

स्पर्धेत निवड झालेले प्रथम, द्वितीय, व तृतीय क्रमांक पटकवलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके व स्मृतिचिन्हे देण्यात आली. पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे

१) श्री.धिरेन नकरानी आणि श्री. नयन वसानी - प्रथम पारितोषिक

२) के.के.वाघ पॉलिटेक्नीक, नाशिक रोख ३०००/- रुपये व स्मृतिचिन्ह

३) श्री. निलेश पी.गांधी -द्वितय पारितोषिक पिंपरी-चिंचवड पॉलिटेक्नीक, पिंपरी रोख २५००/- रुपये व स्मृतिचिन्ह

४) श्री. अजय मोरे - तृतीय पारितोषिक साबुसिद्दीकी पॉलिटेक्नीक, भायखळा रोख २०००/- रुपये व स्मृतिचिन्ह

उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त विद्यार्थी खालीलप्रमाणे

- कुणाल पांडे आणि निशांत पांडे-रोख रुपये १०००/-
- सोनाली थरयानी आणि विपुल कपाडिया - रोख रुपये १०००/-
- इशांत कदम आणि सुहास वानखेडे - रोख रुपये१०००/-




निरोप समारंभाप्रसंगी

डावीकडून : श्री. शिवाजीराव वोडके (MEDA), प्रचार्य दि. कृ. नायक , श्री. गोविंद वोडके , श्री. अशोक पेंडसे सन्मानीय पाहूणे), सौ. एन. व्ही. वडेर

कार्यक्रमाची सांगता निरोप समारंभाने झाली. त्या प्रसंगी मुख्यअतिथी म्हणून ठाणे जिल्ह्याचे उप-जिल्हाधिकारी श्री. गोविंद बोडके उपस्थित होते. तंत्रनिकेतनने आयोजित केलेल्या स्पर्धेबद्दल त्यांनी कौतुक केले. सन्माननीय पाहुणे म्हणुन श्री.अशोक पेंडसे उपस्थित होते. यशस्वी स्पर्धकांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. व कार्यक्रमाची सांगता झाली.

रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करणाऱ्या वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन हे नेहमी राज्य व राष्ट्रीय स्तरावरचे कार्यक्रम आयोजित करीत असते. पर्यायी उर्जेशिवाय तरणोपाय नाही याची जाणीव अशा ह्या कार्यक्रमातून जनमानसात रुजविण्याचे कार्य तरुण पिढीच्या माध्यमाद्वारे केले जाते.

<u>विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त (२००७-२००८) विविध कार्यक्रमांचे आयोजन</u>

१९८३ साली सुरू झालेल्या वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेताचे २५ व्या वर्षात पदार्पण होत आहे. २००७-२००८ हे तंत्रनिकेतनाचे रौप्य महोत्सवी वर्ष असून तंत्रनिकेतनातर्फे ५ सप्टेंबर २००७ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये छायाचित्रांचे प्रदर्शन, सत्यनारायणाची पूजा, जेष्ठ व १००% निकाल लावलेल्या शिक्षकांचा सत्कार व गाण्याचा कार्यक्रम इत्यादींचा समावेश होता.

हेऔचित्य साधून १९८३ पासूनच्या ठळक आठवणींची अनेक छायाचित्रे, आतापर्यंत मिळालेले विविध पुरस्कार, तंत्रनिकेतनने आयोजित केलेले राज्यस्तरीय व राष्ट्रीय शैक्षणिक विषयावरचे विविध सेमिनार्स आणि त्यांची प्रोसिडिंग्ज, पॉलिझिन वार्षिकांचा, असे अनेकरंगी प्रदर्शन तंत्रनिकेतनात आयोजित केले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. एच.ए. मंगळवेढेकर (एच. ए.



प्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्रमुख पाहुणे डॉ. मंगळवेढेकर, सोबत प्राचार्य दि. कृ. नायक, माजी प्राचार्य एस.एस. मुजुमदार, प्रा. सौ. गीताली इंगवले, प्रा. भाकरे, ग्रंथपाल भारती जोशी

विभाग प्रमुख, एच.व्ही.विभाग व्ही.जे.टी.आय, मुंबई) यांचे हस्ते दि.५ सप्टेंबर रोजी सकाळी करण्यात आले. सोबत तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि.कृ.नायक माजी प्राचार्य एस.एस.मुजुमदार, प्रा.व्ही.एस.भाकरे इत्यादी मान्यवर होते. प्रदर्शनास विद्यार्थ्यांसहित सर्वांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

प्रमुख पाहुण्याची ओळख प्रा. सौ.एस.एस. कुलकर्णी यांनी उपस्थितांना करून दिली. प्राचार्य नायक यांनी आपले विचार उपस्थितांना ऐकवले.

५ सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून २० वर्ष अध्यापन करणारे व शंभर टक्के निकाल लावलेल्या अशा शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी प्राचार्य दि.कृ.नायक, माजी प्राचार्य एस.एस. मुजुमदार, प्रा. व्ही.एस. भाकरे, व डॉ.सौ.आर के. जांभोटकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. व या मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला होता. या प्रसंगी वरील मान्यवरांची भाषणे झाली. माजी प्राचार्य मुजुमदार सरांनी सांगितले की, शिक्षकाच्या हातात भावी पिढीचे भवितव्य अवलंबून आहे.



प्रदर्शनस्थळी प्रमुख पाहुण्यासमवेत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

त्यासाठी शिक्षकांनी ज्ञानदानाचे कार्य उत्तमरितीने करावे. तसेच त्यांनी तंत्रनिकेतनच्या प्रारंभीच्या आठवणी सांगितल्या. प्राचार्य दि.कृ. नायक यांनी तंत्रनिकेतनचा २५ वर्षांचा आढावा सादर केला. प्रसंगी प्रा.व्ही.एस.भाकरे यांनीही आपले विचार मांडले. त्या प्रसंगी प्रा. गुप्ते मॅडम यांनी छोटीसी कविता सादर केली. यानंतर कल्याणी जोशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गाण्याचा कार्यक्रम सादर केला. त्यांच्या सुश्राव्य गायनाने सर्व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

- संकलीत

•••

## इतिहास शब्दकोड्यांचा

शब्दकोडी आजकाल आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. मराठी आणि इतर सर्व भाषांत हा प्रकार तसा नवीन असला तरी इंग्रजीत बराच जुना आहे.

ग्लोसच्या सिरेन्सेस्टर येथे १८६८ मध्ये एका भिंतीवर रोमन लिपीतील शब्दकोडे चितारलेले आढळले होते. मात्र 'द पीपल्स होम जर्नल' या महिलांच्या नियतकालिकात १९०४ मध्ये प्रथम शब्दकोडे प्रसिद्ध झाले होते. २१ डिसेंबर १९१३ पासून वर्तमानपत्रातील शब्दकोड्यांना प्रारंभ झाला. ऑर्थर विन यांचे हे शब्दकोडे न्युयॉर्क वर्ल्ड मध्ये प्रसिद्ध झाले होते. आतापर्यंत सर्वात मोठे शब्दकोडे कॅनडातील क्युबेकचे रॉबर्ट टरकोट यांनी जुलै १९८२ मध्ये रचले. या शब्दकोड्यात ८२ हजार ९५१ चौकोन होते आणि आडवे १२ हजार ४८९, तर उभे १३ हजार १२५ शब्द. या शब्दकोड्याचा आकार जवळपास ४० चौरस फूट होता. रॉजर स्क्वीर दर आठवड्याला ४२ शब्दकोड्यांची रचना करायचे. १९९१ सालापर्यंत त्यांनी ३७ हजार ५०० शब्दकोडी तयार केली होती.

•••

दिशा
नियमित

# विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

## *लेटेस्ट ट्रेण्डस् इन नॅनोटेक्नोलॉजी*

विद्या प्रसारक मंडळ ठाणे यांच्या तंत्रनिकेतनाने ५ जानेवारी २००८ रोजी "Latest Trends In Nano Technology" या विषयावर राष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. 'नॅनोटेक्नोलॉजी' हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे महत्वाचे अंग असून, ते अतिसूक्ष्म पदार्थ मिळविण्यासाठी वापरले जाते. नॅनोटेक्नोलॉजीच्या शोधाने अतिसूक्ष्म यंत्र, उपकरणांच्या वापराला नवीन दिशा मिळाली आहे.

हे नवीन तंत्रज्ञान भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, केमिकल इंजिनीअरिंग आणि पदार्थविज्ञान अशा वैविध्यपूर्ण शाखांमधील शास्त्रज्ञांना आव्हान आहे. या तंत्रज्ञानाचे अनंत फायदे आहेत. या विषयावरील दोन प्राथमिक कार्यशाळा १७ फेब्रुवारी आणि ३० ऑगस्ट २००७ रोजी आयोजित करण्यात आल्या.

येणाऱ्या काही वर्षांत, नॅनोटेक्नोलॉजी या तंत्रज्ञानाचे परिणाम रोजच्या जीवनातील बाबींवरती दिसून येतील. ही परिषद तंत्रज्ञान जाणून घेण्यासाठी, त्यावर चर्चा करण्यासाठी आणि नवीन कल्पना मांडण्यासाठी उत्तम व्यासपीठ आहे. या परिषदेत आय. आय. टी. मुंबई, इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, एन.सी.एल. पुणे अशा संस्थांतील मान्यवर वक्ते सहभागी होणार आहेत. या परिषदेत वस्त्रोद्योग, कृषिउद्योग, उर्जाबचत उपकरणे, ऑटोमोबाईल उद्योग अशा विविध क्षेत्रांशी संबधित विषय हाताळले जातील. तसेच चित्रदर्शन आयोजित करण्यात येईल, व महत्वाचे संशोधन कार्य चित्रस्वरुपात मांडण्यात येईल.

यात अतिसूक्ष्म पदार्थांच्या प्रक्रियांची प्रात्यक्षिकेही दाखविण्यात येतील.

ही परिषद वैज्ञानिक, अभियंते, तंत्र, उद्योजक आणि विद्यार्थी यांना एकत्र आणण्यात निश्चितच यशस्वी ठरेल. तसेच विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील संशोधन व विकास कार्यासाठी उपयुक्त करेल.

**श्रीमती उषा राघवन**
परिषद सचिव,
विभाग प्रमुख, माहिती तंत्रज्ञान,
वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

इच्छुकांनी श्रीमती उषा राघवन यांच्याशी संपर्क साधावा असे प्राचार्य दि.कृ. नायक यांनी सांगितले आहे.

# श्रद्धांजली



विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयाचे माजी मानद प्राध्यापक श्री. ठाकूर स्वरूपा हे वयाच्या ७५ व्या वर्षी अनंतात विलिन झाले. जवळ जवळ २२ वर्षांपेक्षा जास्त काळ ते विधी महाविद्यालयात मानद प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. तसेच भारत वाणिज्य महाविद्याल बदलापूर येथील संस्थापक प्राचार्य आणि भारत संस्थेच्या शाखा तसेच महाविद्यालयाचे देखील ते विश्वस्त होते.

सरांनी इंग्रजी, वाणिज्य, विधी, शिक्षण आणि हिंदी या विषयात पदव्युतर शिक्षण घेतले होते, तर हस्तकला, बालकल्याण, नाट्य, आधुनिक गणित, उर्दू, संगणक आणि योग या विषयात पदविका संपादन केल्या होत्या. तसेच विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी भारतीय दंडविधान संहिता, गुन्ह्याची तत्त्वे आणि कायदा गुन्हेगारशास्त्र आणि इंग्रजी या विषयांच्या पुस्तकांचेही योगदान दिले आहे. मुंबई विद्यापीठाच्या विधी शाखेच्या पदव्युतर अभ्यासक्रमासाठी देखील प्राध्यापक म्हणून ते कार्यरत होते. मुंबई उच्च न्यायालयात वकील तसेच विशेष कार्यकारी दंडाधिकारी या पदासाठीही त्यांनी काम पाहिले होते.

श्री. स्वरूपा सरांनी ठाणे विधी महाविद्यालयात भारतीय दंडसंहिता, गुन्हेगारशास्त्र, भारतीय पुरावा कायदा, इंग्रजी, फौजदारी प्रक्रिया संहिता अशा विविध विषयांसाठी अध्यापन केले होते. त्यांची शिकविण्याची हातोटी प्रभावी पण तितकीच खुमासदार असल्याने केवळ विद्यार्थीच नव्हे , तर सहकारी प्राध्यापकांतही ते फार प्रिय होते. अध्यापनविषयक बांधीलकी आणि त्यासाठीचा व्यासंग यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे श्री. स्वरूपासर. 'विद्या विनयेन शोभते' ही उक्ति सरांच्या बाबतीत अगदी सार्थ होती. आज महाविद्यालयाचे बरेचसे प्राध्यापक सरांचे माजी विद्यार्थी आहेत. सरांच्या निधनाने झालेली हानी कधीही न भरून येणारी आहे. सरांच्या स्मृती सर्व विद्यार्थी प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सदैव स्मरणात राहतील. विधी महाविद्यालयाच्या संपूर्ण कर्मचारी वर्गातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

प्राचार्या,
विधी महाविद्यालय, ठाणे
(विद्यार्थी, प्राधापक, कर्मचारी यांच्यावतीने)